मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०१ ■ शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## () थोडक्यात ()

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना इथिओपियाचा सर्वोच्च सन्मान प्रदान



**अदिस अबाबा :** इथिओपिया ही सिंहांची भूमी आहे, माझे गृहराज्य गुजरात हीसुद्धा सिंहांची भूमी आहे, त्यामुळे आपल्या येथे येऊन खूप आनंद होत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इथिओपियाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करताना सांगितले. दरम्यान, 'द ग्रेट ऑनर निशाण ऑफ इथिओपिया' हा सर्वोच्च सन्मानही यावेळी मोदी यांना इथिओपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.सदर सन्मान मिळविणारे मोदी हे पहिले जागतिक नेते ठरले आहेत. हा सन्मान आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे, असेही मोदी म्हणाले. मोदी मंगळवारीच इथिओपियामध्ये पोहोचले होते. हा त्यांचा पहिला दौरा आहे. अबी अहमद अली यांनी नॅशनल पॅलेसमध्ये त्यांचे औपचारिक स्वागत केले. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठकही घेतली. मोदी यांचे भाषण संपताच खासदारांनी उभे राहून टाळयांचा कडकडाट केला.मोदी म्हणाले, कोविड-१९ दरम्यान भारताने १५० हून अधिक देशांमध्ये औषधे आणि लसी पाठवल्या. इथिओपियाला ४० लाखांहून अधिक लसीचे डोस पुरवणे ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट होती. भारतात आम्ही स्वतःची सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण केली आहे. यामुळे सरकारी सेवा जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. आज, भारतातील जवळजवळ प्रत्येकजण पेमेंट, ओळख आणि सरकारी सेवांसाठी डिजिटल पद्धती वापरतो.

# लोकसभेत प्रचंड गदारोळात 'विकसित भारत जी राम जी' विधेयक मंजूर

## विरोधी खासदारांनी शिवराज सिंह चौहानांवर भिरकावले कागद

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, वार्ताहर :**

लोकसभेत गुरुवारी प्रचंड गदारोळात 'विकसित भारत जी राम जी' (VB-G RAM G) विधेयक मंजूर करण्यात आले. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांनी आक्रमक पवित्रा घेत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या दिशेने कागद भिरकावल्याने सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**विधेयकावरुन सत्ताधारी-विरोधक आमनेसामने**



गेल्या अनेक दिवसांपासून या विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष सुरू आहे. सरकारने या योजनेतून महात्मा गांधींचे नाव जाणीवपूर्वक हटवल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. तर 'विकसित भारत'चे व्हिजन डोळ्यासमोर ठेवूनच योजनेत हे बदल करण्यात आल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

**लोकशाही परंपरांचा अवमान : शिवराज सिंह चौहान**

शिवराज सिंह चौहान म्हणाले की, "मी रात्री दीड वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आहे. आता उत्तर देणे हा माझा अधिकार आहे, परंतु केवळ स्वतःचे म्हणणे मांडायचे आणि सरकारचे उत्तर ऐकून न घेणे, ही लोकशाहीची थट्टा आहे. हे संविधानाच्या चिंधड्या उडवण्यासारखे असून बापूंच्या (महात्मा गांधी) आदर्शांची हत्या करण्यासारखे आहे. आपलेच म्हणणे रेटणे आणि दुसऱ्याचे न ऐकणे, हा देखील एक प्रकारचा हिंसाचारच आहे."

**... तर पंडित जवाहरलाल नेहरुंचा अपमान झाला का?**

पत्रकार परिषदेत बोलताना केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, "ग्रामीण विकास आणि रोजगारासाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. सर्वसमावेशक ग्रामीण रोजगार योजना, त्यानंतर जवाहर रोजगार योजना, आणि त्यानंतर मनरेगा आली. जर त्यात पंडित जवाहरलाल नेहरूंचे नाव समाविष्ट केले नाही, तर याचा अर्थ त्यांचा अपमान झाला का?. 'विकसित भारतासाठी विकसित गावे' हा पंतप्रधान मोदींचा संकल्प आहे आणि त्यासाठी पुरेसा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे, अशी माहितीही दिली.

# टेंभुर्णी राजुर रोडवर मोठा अपघात १ जण ठार तर १९ जण जखमी

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी/अनिल ससाने**

: जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यामधील देळेगव्हाण शिवारातील हद्दीत ४०७ टेम्पो व स्कुटी चा मोठा अपघात झाला ह्या अपघातामध्ये १ जण ठार तर १९ जण जखमी राजुर वरून टेंभुर्णी कडे जाणारा टेम्पो ४०७ टेम्पो या टेम्पोमध्ये आद्रक काढणारे (मजूर)होते व टेंभुर्णी कडून शेताकडे जाणारा शेतकरी रमेश किसन जाधव हेआपल्या स्कुटीवर शेताकडे जातअसताना अचानक समोरून येणारा ४०७ टेम्पो नंबर MH96AG4877 यांनी जोरदार धडक दिली या धडकीमध्ये रमेश किसन जाधव यांचा जागीच मृत्यू झाला व टेम्पो पलटी होऊन १९ जण मजूर अतिशय गंभीर जखमी झाले यांच्यामध्ये लहान मुले सुद्धा जखमी झालेली आहे यामध्ये विक्रम आवासे, गणेश आवासे, देवीसिंग आवासे, खुमाणसिंग आवासे, बेलातीबाई आवासे, महेश आवासे, आकाश चव्हाण, समीर नार्वे, परी आवासे, अनिता आवासे, बळीराम आवासे, रोहित चव्हाण, राधिका सोळुंके, मोलीबाई आवास, येपल किसके, राजाराम दावन, रूपसिंग आवासे, असे जखमींचे नावे आहे हे सर्व (मध्यप्रदेश)



याराज्यातील आहे जखमींना तातडीने टेंभुर्णी रुग्णालय येथे हलवण्यात आले विकट परिस्थिती असल्यामुळे डॉक्टरांनी जखमींना पुढील उपचारासाठी जालना येथे रेफर केले आहे अकोला देव बीट जमदार राजू डोईफोडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला त्यावेळी जिल्हा परिषद सदस्य शालिकराव म्हस्के व अकोला देव जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित रामधन पाटील कळंबे सुनील देशमुख व इतर जण घटनास्थळी उपस्थित होते.

# किडनी विकावी लागणे ही शेतकऱ्यांच्या अडचणींची परिसीमा! - सुप्रिया सुळे

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, वार्ताहर :**

अवघ्या एक लाख रुपयांच्या कर्जापोटी सावकारांना तब्बल ७४ लाख रुपयांची परतफेड करावी लागली. कर्जाच्या अमानुष तगाद्यामुळे शेती, वाहने विकल्यानंतर अखेर शेतकऱ्यावर स्वतःची किडनी विकण्याची वेळ आली. अवैध सावकारांच्या क्रूर छळाचा हा धक्कादायक प्रकार चंद्रपूरच्या नागभीड तालुक्यातील मिथूर गावात उघडकीस आला असून त्यावरून आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार टीका केली आहे.

रोशन शिवदास कुळे असे पीडित शेतकऱ्याचे नाव आहे. या प्रकरणात सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. रोशन कुळे या पीडित शेतकऱ्याने दुग्धव्यवसायासाठी १५ ते २० गायी खरेदी केल्या. मात्र लम्पी आजाराने काही जनावरे दगावल्याने व्यवसाय तोट्यात गेला. अडचणीत सापडलेल्या रोशनने ब्रह्मपुरीतील काही अवैध सावकारांकडून एक लाख रुपये कर्ज घेतले. मात्र, चार ते पाच जणांच्या टोळीने अवाढव्य व्याज आकारत दमदाटी सुरू केली. कर्ज फेडण्यासाठी रोशनने दुचाकी, ट्रॅक्टर, साडेतीन एकर शेतीही विकली; मात्र व्याजाचा डोंगर वाढतच राहिला व



अखेर त्याला आपली किडनी विकावी लागली. यावरून सुप्रिया सुळे यांनी 'एक्स'वर पोस्ट करत तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली.

**माणुसकीला काळीमा**

महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. आबा पाटील यांनी शेतकऱ्यांना नाडणाऱ्या खासगी सावकारांना 'कोपरापासून ढोपरापर्यंत' सोलून काढायची घोषणा केली होती. त्यानंतर मुजोर खासगी सावकारांच्या विरोधात कठोर कारवाया करुन त्यांच्या मुसक्या आवळल्या होत्या. राज्यातील शेतकऱ्यांचे अशा पद्धतीने रक्षण करणारे, त्यांच्या अडीअडणीत खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे सरकार एकेकाळी महाराष्ट्रात अस्तित्वात होते. परंतु सध्याच्या काळात शेतकऱ्यांच्या अडचणींची अक्षरशः परिसीमा झाली असून त्यांच्यावर किडन्या विकण्याची वेळ आली.

# भूमिपुत्रांनो, साखरपुडा-हळदी समारंभात रमू नका : महेंद्रशेठ घरत

## उरण प्रीमियर लिग लिलावाचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उदघाटन

## महेंद्रशेठ घरत यांच्याकडून एक लाख रुपयांची देणगी

**दैनिक युवक आधार**
**उलवे,प्रतिनिधी :**

"भूमिपुत्रांनो सावध व्हा, साखरपुडा-हळदी, लग्न यांच्यातच रमू नका. जागा मिळेल तिथे गरजेनुसार घरे बांधा, मैदाने तयार करा, ती जमीन गुरचरण असो, वन खात्याची. कारण सरकार कॉंक्रिटचे जंगल उभारत आहे, बहुसंख्य जमीन बिल्डरांच्या घशात घालत आहे. पण हे करताना श्वास घ्यायला तरी जागा हवी ना, त्यासाठी प्रत्येक गावाला मैदान मिळणे, ही त्या गावाची, परिसराची गरज आहे आणि येथील जनतेचा तो हक्कही आहे. उद्या परप्रांतीय येतील आणि बिन्धास्त



झोपड्या बांधतील. कालांतराने सरकार त्या अधिकृत करेल, हा मुंबई, नवी मुंबईचा इतिहास आहे. त्यामुळे वेळ गेलेली नाही. भूमिपुत्रांनो सावध व्हा! भूमिपुत्रांच्या भल्यासाठी मी ना आमदार ना खासदार, पण दमदारपणे लढत आहे, " असे महेंद्रशेठ घरत मानघर येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते बुधवारी (ता. १७) रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध उरण प्रीमियर लिग २०२५-२६ च्या लिलाव प्रक्रियेचे छाया रिसॉर्ट येथे उदघाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते प्रीमियर लिगच्या चषकाचे आणि बक्षीस म्हणून देण्यात येणाऱ्या दुचाकीचे अनावरणही करण्यात आले. ही प्रिमीयर लिग ५ ते ११ जानेवारी दरम्यान होणार आहे. यावेळी संघमालक आणि खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धा चिर्ले येथील राधेय मैदानावर होणार आहेत. गावदेवी गावठाण संघाने लिवाव प्रक्रियेचे आयोजन केले होते.

उद्योगपती कुमारशेठ पाटील, गोपीनाथ म्हात्रे, मुरलीधर ठाकूर, विनोद पाटील, चैतन्य पाटील, नितेश पाटील, अंगद ठाकूर, राजेश ठाकूर, राजेंद्र भगत, मनोज ठाकूर आदी उपस्थित होती. सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.

# भारतीय शिल्पकलेतील युगाचा अंत; 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे शिल्पकार राम सुतार यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' चे भारतातील ज्येष्ठ शिल्पकार राम वनजी सुतार यांचे बुधवारी (दि.१७) रात्री उशिरा नोएडामधील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. ते १०० वर्षांचे होते. वृद्धापकाळाशी संबंधित आजारांमुळे ते काही काळापासून आजारी होते. त्यांच्या निधनाने भारतीय भव्य शिल्पकलेतील एका ऐतिहासिक पर्वाचा अंत झाला आहे.

या बातमीला दुजोरा देताना त्यांचा मुलगा अनिल सुतार यांनी गुरुवारी (दि.१८) निवेदनात सांगितले, "अत्यंत दुःखाने कळवतो की माझे वडील, ज्येष्ठ शिल्पकार राम वनजी सुतार यांचे १७ डिसेंबर रोजी मध्यरात्री आमच्या नोएडामधील निवासस्थानी निधन झाले."

**धुळे जिल्ह्यातील गावातून जागतिक ओळख**

१९ फेब्रुवारी १९२५ रोजी



महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील गोंदूर गावात जन्मलेल्या राम सुतार यांनी लहानपणापासूनच कला आणि शिल्पकलेची आवड जोपासली. पुढे त्यांनी मुंबईतील प्रतिष्ठित सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट अँड आर्किटेक्चर येथून शिक्षण घेतले. त्यांनी सुवर्णपदक मिळवत पदवी संपादन केली. त्यानंतर सुरू झालेला त्यांचा कलाप्रवास तब्बल सात दशकांहून अधिक काळ चालू राहिला.

**राष्ट्रीय स्मारकांची दृश्य भाषा घडवणारे शिल्पकार**

राम सुतार यांच्या कलाकृतींमध्ये महात्मा गांधींचा ध्यानस्थ पुतळा, संसद भवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह अनेक राष्ट्रीय नेत्यांचे आणि समाजसुधारकांचे पुतळे समाविष्ट आहेत.

त्यांची सर्वात प्रसिद्ध आणि जागतिक स्तरावर ओळखली जाणारी कलाकृती म्हणजे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'. भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना समर्पित असणारे हे शिल्प १८२ मीटर उंच आहे. ही कलाकृती सध्या जगातील सर्वात उंच पुतळा म्हणून ओळखली जाते.

**सन्मान आणि गौरव**

भारतीय कला आणि सांस्कृतिक वारशातील अमूल्य योगदानाबद्दल राम सुतार यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले. १९९९ मध्ये पद्मश्री, २०१६ साली पद्मभूषण तर २०२५ मध्ये महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी सन्मान महाराष्ट्र भूषण पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले.

**शेवटपर्यंत सक्रिय**

वयाच्या १००व्या वर्षीही राम सुतार कार्यरत होते. मुंबईतील इंदू मिल येथे उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामात ते सक्रियपणे सहभागी होते. आयुष्याच्या अखेरच्या क्षणांपर्यंत शिल्पकलेशी असलेली त्यांची निष्ठा आणि समर्पण सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.

# मराठी शाळा वाचवण्यासाठी मोर्चा

## पोलिसांनी आंदोलकांना नेलं आझाद मैदानात

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

मुंबईतील मराठी माध्यमाच्या शाळांचं अस्तित्व धोक्यात आल्याचं पुन्हा एकदा समोर आलं आहे. गेल्या काही वर्षात महापालिकेच्या अनेक मराठी शाळा बंद पडल्या असून काही शाळांचं विलिनीकरण तर काही शाळा इमारतींच्या कारणावरून पूर्णपणे हटवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मराठी शाळा वाचवण्याच्या मागणीसाठी मराठी अभ्यास केंद्र आणि मराठी शाळा कृती समिती तसंच विविध संघटनाच्या वतीनं मोर्चा काढण्यात आला. मात्र, महानगरपालिकेमध्ये जाण्याआधीच पोलिसांनी आंदोलकांना आझाद मैदानात नेलं.

**आंदोलक-पोलिसांची बाचाबाची :** सकाळपासूनच हुतात्मा चौक स्मारकाजवळ आंदोलकांनी जमायला सुरुवात केली. चार-चार जणांच्या गटानं अभिवादन करून महानगरपालिकेकडं जाण्याच्या सूचना आंदोलकांना पोलिसांनी दिल्या होत्या.

त्याप्रमाणं मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, ज्येष्ठ नेते कॉम्रेड प्रकाश रेड्डी



आणि मराठी शाळा सदिच्छा दूत चिन्मयी सुमित यांच्यासह विविध संघटना आणि संस्थांचे कार्यकर्ते महापालिकेच्या दिशेनं निघाले होते. मात्र, मध्येच पोलिसांकडून सतत थांबवण्यात येत असल्यामुळं काही काळासाठी आंदोलक आणि पोलिसांमध्ये बाचाबाची देखील झाली.

**तुम्ही इथं बसू शकत नाही :** "आम्ही इथंच शांततेत बसतो अशी विनंती पोलिसांना केली. त्यावर पोलिसांनी सांगितलं, तुम्ही इथं बसू शकत नाही. असं म्हणून सर्वांना जबरदस्तीनं गाड्यांमध्ये चढवण्यास सुरुवात केली. यावेळी ज्येष्ठ आंदोलक प्रकाश रेड्डी यांना धक्काबुक्की झाली. आंदोलनाची सूचना आणि निवेदन महानगरपालिका आयुक्तांना दिलेलं असताना देखील आज दुपारी अडीच वाजताची वेळ आम्हाला दिली आहे," असं दीपक पवार यांनी सांगितलं.

# पनवेलमध्ये ‘महाराष्ट्र ची सौंदर्यवती 2025’ स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते (पनवेल) :** साहस फाउंडेशनतर्फे SS Cinevision व श्री प्रह्लाद राय झुलेलाल ट्रस्ट पनवेल यांच्या साहाय्याने आयोजित ‘ब्युटी पेजंट – महाराष्ट्र ची सौंदर्यवती 2025’ हा भव्य कार्यक्रम मंगळवार, दि. 16 डिसेंबर 2025 रोजी पनवेल येथील सिंधी पंचायत हॉलमध्ये उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन साहस फाउंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कुरूप, झुलेलाल ट्रस्टचे ॲडव्होकेट मनोहर सचदेव, अभिनेत्री सिद्धी कामत, रेश्मा भोईर आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

या स्पर्धेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे— लहान मुलं-मुली, मिसेस, मिस या गटाबरोबरच स्पेशली एबल्ड मुलांनाही या मंचावर समान संधी देण्यात आली होती.

अध्यक्ष रेश्मा कुरूप म्हणाल्या की,“सौंदर्यस्पर्धेद्वारे व्यासपीठ उपलब्ध करून देताना स्पेशली एबल्ड मुलांना सामान्य मुलांबरोबर संधी देऊन त्यांचा मनोबल वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यांच्या प्रतिभेला ओळख मिळणे हे आमचे ध्येय आहे.”



**स्पर्धेतील विजेते**

एकूण 65 स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. प्रमुख बहुमानांचे निकाल पुढीलप्रमाणे :

महाराष्ट्र ची सौंदर्यवती मिसेस (50+ गट): सौ. मानसी सुर्वे

महाराष्ट्र ची सौंदर्यवती मिसेस (ओपन गट): सौ. हर्षला कारंडे

महाराष्ट्र ची सौंदर्यवती मिस: पूजा बंदरकर

याशिवाय अनेक स्पर्धकांना फॅशन आयकॉन, फोटोजेनिक फेस आदी विविध प्रकारचे टायटल्स, क्राऊन व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. विजेत्यांना मालाबार ज्वेलर्सतर्फे चांदीचे नाणे आणि VLCC कडून गिफ्ट व्हाउचर्स देण्यात आले.विजेत्यांना साई पलक डेव्हलपर चे प्रो भूषण पोवळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले

**मुख्य अतिथी, परीक्षक व आयोजन**

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून सिनेस्टार श्री संजय खापरे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. जे. कोमल, तर कोरिओग्राफी अभिनेत्री स्वप्नाली केलजी आणि अभिनेता देवदत्त घरात यांनी केली.विजेत्यांची निवड कामोठे येथील आदी मॅटर्निटी हॉस्पिटल व स्किन क्लिनिकचे डायरेक्टर डॉ. शीतल गोसावी, अभिनेत्री अर्चना पवार आणि स्वाती सोनावणे यांनी केली.कार्यक्रमास सौ. मोहिनी विक्रांत पाटील, श्री भूषण पोवळे, श्री महादेव घरात, उद्योजिका रेश्मा भोईर, उद्योजिका माधवी भोईर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच माननीय प्रीतम म्हात्रे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**कौतुकाची थाप**

या नाविन्यपूर्ण व महत्त्वपूर्ण उपक्रमाबद्दल अध्यक्षा रेश्मा कुरूप व ॲडव्होकेट मनोहर सचदेवा यांच्याबद्दल सर्वत्र स्तुती आणि कौतुक होत आहे. तसेच साहस फाउंडेशनचे अनघा गोळे, शीतल आंबेरकर, अनविका आणि अजिंक्य यांनी कार्यक्रमात विशेष योगदान दिले.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी केली अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** खारघर परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी अटक केली आहे. अजयकुमार जनझोरड (२९) असे त्याचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका करून तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.अजयकुमार हा खारघरमधील पेठ गावात राहण्यास होता. गेल्या काही महिन्यापूर्वी आरोपी अजयकुमार याने पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने संधी साधून पीडित मुलीला पळवून नेत तीला कळंबोली लेबर कॅम्प मधील रूमवर नेऊन ठेवले होते. पीडित मुलीने तिची आई काम करत असलेल्या मॅडमच्या घरी जाते असे लहान बहिणीला सांगून घरातून निघून गेली होती. मात्र, सायंकाळपर्यंत घरी



परतली नव्हती. त्यामुळे तिच्या घरच्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीनुसार खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली होती. या तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, पीडित मुलगी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर खारघर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुचाकीचा नंबर मिळवून त्याच्या मालकाचा शोध घेतला असता, ही दुचाकी अजयकुमार याची असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन खारघरमधील पेठ गावातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची अधिक चौकशी केल्यानंतर त्याने आपला गुन्हा कबूल करत पीडित मुलीला कळंबोली येथील लेबर कॅम्पमधील घरामध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी पीडित मुलीला कळंबोली येथून ताब्यात घेऊन तिला तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. दरम्यान, पोलिसांनी पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी केली असता, अजयकुमार याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## संदेश कॉलेजमध्ये ग्राहक पंचायत महाराष्ट्र,मुंबई उपनगर शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी टागोर नगर येथील संदेश कॉलेजमध्ये ग्राहक पंचायत महाराष्ट्र,मुंबई उपनगर शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम गुरुवार, दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी संपन्न झाला.सध्या ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या वतीने १५ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ग्राहक पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.या कार्यक्रमात समाजसेविका व पंचायत समितीच्या सदस्या जयश्री खिलारी यांनी प्रबोधनपर मार्गदर्शन केले.याप्रसंगी दिनेश बेरीशेट्टी,ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,पत्रकार सहिष्णुता कांबळे,राजाराम राव, रविंद्र वाघमारे,सुरेश पांचाळ, सुनिल भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

जयश्री खिलारी यांनी १९८६ साली कुठलेही आंदोलन न करता ग्राहकतीर्थ,स्वातंत्र्यसेनानी बिंदुमाधव जोशी यांनी संसदेत ग्राहक संरक्षण कायदा पास करून घेतल्याचे सांगितले. या कायद्याचे महत्त्व सांगताना त्या म्हणाल्या,पेट्रोलपंप येथे टॉयलेट असते. एक महिला एका पेट्रोलपंपावर गेली असता तिने तेथे वॉशरुमची मागणी केली पण त्या पेट्रोलपंप वाल्यांनी तीला ते उघडून देण्यास




असमर्थता दर्शविली.अखेर तिने ग्राहक पंचायत कडे दाद मागितली.कायद्याने गुन्हा असल्यामुळेच पेट्रोलपंपधारकाला त्या महिलेस दिड लाखाचा दंड द्यावा लागला.आपण छोटी खरेदी करता.पण त्याचे बील घेणे आवश्यक आहे.कुठलीही वस्तू घेताना त्याची एक्सपायरी तारीख, मुल्य,मॅन्युफॅक्चरिंग तारीख,आयएसआय मार्क आपण तपासून घ्यावेत.म्हणजे तक्रार करताना त्याचा आपणास उपयोग होईल.या संस्थेकडून दुधाचे जास्त दर घेणे,पेट्रोल,डिझेल चोरी, ऑनलाईन खरेदी,मोबाईल खरेदी करताना घेण्याची काळजी यावर जयश्री खिलारी यांनी प्रकाश टाकला.ही संस्था कुठलेही मानधन न घेता आपल्याला न्याय मिळवून देईल.असे सांगताना हे पत्रक आपल्या पालकांना जरूर दाखवा.याकडे त्यांनी लक्ष्य वेधले.शेवटी संदेश कॉलेजच्या तृप्ती बर्वे मॅडम यांना ग्राहक पंचायतची पुस्तिका भेट देण्यात आली.दिनेश बेरीशेट्टी यांनी आभार मांडले.

## श्री विकास शिरसट ( पोलीस पाटील ) यांच्यावर ईश्वरपूर उपविभागीय पोलिसांकडून कौतुकाची थाप

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** महाराष्ट्रात दरवर्षी १७ डिसेंबर रोजी पोलिस पाटील दिन साजरा केला जातो. पोलीस पाटील नेहमी गावातील गाव पातळीवर कायदा-सुव्यवस्था राखणे, पोलिसांना सहकार्य करणे,गुन्हे प्रतिबंध, शांतता व सलोखा राखण्यात भूमिका शासन व नागरिक यांच्यातील दुवा म्हणून काम करतो.सांगली जिल्ह्यात सन्माननीय विकास शिरसाट हे सावंतवाडी येथील पोलीस पाटील पदावर काम करत आहेत. त्यांनी गाव पातळीवर कोर्ट कचेरी, पोलीस स्टेशन पर्यंत न जाता गाव पातळीवर अनेक वाद विवाद मिटवून त्यांनी गावचा अनाठाई होणारा खर्च थांबवला. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात घर निर्माण



केले आहे.शिराळा तालुक्यातील सावंतवाडी गावचे सन्माननीय विकास शिरसट (आण्णा) यांना १७ डिसेंबर रोजी पोलीस पाटील दिनानिमित्त उल्लेखनीय काम केल्याबद्दल ईश्वरपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी (DYSP ) मा. अरुण पाटील साहेब यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. विकास शिरसाट यांच्या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून कौतुक कौतुक होत आहे

## तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ज्येष्ठ शिल्पकार डॉ राम सुतार यांना श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/सतीश कडू/ संपादक नागपूर :** विभाग शिल्पकला क्षेत्रावर आपले आणि महाराष्ट्राचे नाव कोरणारा तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मश्री, महाराष्ट्रभूषण ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांना निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सुतार यांचे सुपुत्र अनिल सुतार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांना सांत्वना दिली.

मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, रामभाऊंच्या निधनाने जागतिक कीर्तीचा कलाकार आपल्यातून निघून गेला. प्रमाणबद्धता आणि त्यातील जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्टय होते. काही दिवसांपूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यासाठी आम्ही त्यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गेलो होतो, पुरस्कार स्वीकारताना त्यांनी 'महाराष्ट्र माझा' या गीताच्या ओळी उच्चारल्या तेव्हा भारावून गेलो होतो. अनेक शिल्पांना त्यांनी आकार दिला. स्टॅच्यु ऑफ यूनिटीमधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा किंवा अंदमानमधील वीर सावरकर यांचा पुतळा. शंभराव्या वर्षी सुद्धा ते इंदू मिल येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामात गुंतले होते.

त्यांनी तयार केलेले अनेक पुतळे संसद भवन परिसरात उभे आहेत. आपले आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, आपले संत अशा मोठ्या मांदियाळीच्या शिल्पांना आकार देण्याचे काम त्यांनी केले. या शिल्पांच्या माध्यमातून त्यांची कला शतकानुशतके आपल्या स्मरणात राहील आणि प्रत्येक शिल्प पाहताना त्यांचेच स्मरण होईल, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची ५० वर्ष पूर्ण; स्त्री हक्कांच्या नव्या पर्वाची सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेला ५० वर्ष पूर्ण झाल्याने मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सेंटरमध्ये येत्या २०,२१ आणि २२ डिसेंबरला तीन दिवसीय राज्यव्यापी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत गेल्या ५० वर्षांतील स्त्री चळवळीचा आढावा आणि पुढील ५० वर्षांच्या कामाची दिशाही ठरविण्यात येणार आहे. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेसह ६५ हून अधिक संघटना मिळून अनेक वर्षांपासून महिलांचे स्वतंत्र आणि हक्कांसाठी कार्यरत आहेत.

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद ही राज्यातील एक महत्त्वाची सामाजिक चळवळ असून




ती स्त्रियांचे हक्क, स्वावलंबन, समानता आणि न्याय यासाठी कार्यरत आहे. समाजातील स्त्रियांवरील वाढते हिंसाचार रोखण्यासाठी तसेच चर्चा घडवण्यासाठी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने राज्यव्यापी परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ही परिषद केवळ ५० वर्ष पूर्ण झाली म्हणून उत्सव नाही तर सध्याच्या राजकारणाचे आणि अर्थकारणाचे भान जागरूक करणे आणि त्यासाठी लढण्यास तरुण पिढीला तयार करणे हा उद्देश आहे. आमचा आक्षेप आजच्या वातावरणाला आहे तो आक्रमकता आणि हिंसा याला प्रोत्साहन देत आहे.

स्त्रियांची प्रगती ही तेव्हाच होऊ शकते जेव्हा समाजातील लोकांच्या विचारांमध्ये बदल होईल. महिलांचे प्रश्न समाजासमोर मांडत त्या प्रश्नांची उत्तर सोडविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करत आहोत.

निराधार, गरजू महिलांपर्यंत पोहचण्यासाठी पोस्टर्स, कलापथकं आणि भाषणे हा त्रिसूत्री कार्यक्रमातून परिषदेने आजतागायत अनेक उपक्रम राबविले जाणार आहे.

## राष्ट्रीय समाज पक्षाचा पहिला जिल्हा परिषदेचा उमेदवार ठरला

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/ अशोक नवघरे :** आगामी घेऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रीय समाज पक्षानी जिल्हा परिषद पंचायत समिती च्या निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक उमेदवारांनी आपल्या अर्ज कागदपत्रांसह इच्छुक उमेदवारांनी राष्ट्रीय समाज पक्ष कार्यालयात दाखल करण्यात यावे अशी मागणी केली होती तर आज दि १८ डिसेंबर रोजी सोनपेठ



तालुक्यातील नरवाडी जिल्हा परिषद सर्कल मधून ओ बी सी महिला साठी राखीव जागेवर बाबाराव हरगुडे यांनी आपल्या पत्नीस सौ सिमा बाबाराव हरगुडे यांनी आपला इच्छुक म्हणून उमेदवारी अर्ज राष्ट्रीय समाज पक्षाच्या जिल्हा अध्यक्ष अशोक हाके यांच्या कडे दाखल केला आहे यामुळे जिल्हा सचिव राजेभाऊ हिंगे ज्ञानोबा ताटे मराठवाडा अध्यक्ष आश्रोबा कोळेकर बाबासाहेब दुगाणे विधानसभा अध्यक्ष सिध्देश्वर ताल्डे तालुका अध्यक्ष रामेश्वर अळसे शहर अध्यक्ष ऋषिकेश भंडारे व इच्छुकांची मोठी संख्या यामुळे उपस्थित होती

## शिवसेनेतून निवडणूक लढवण्यासाठी महिला इच्छुकांची विक्रमी गर्दी ; महापालिकेच्या २२७ वॉर्डसाठी २७०० हून अधिक इच्छुकांनी दिल्या मुलाखती

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामांमुळे इच्छुकांना विजयाचा विश्वास

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेनेतून निवडणूक लढवण्यासाठी हजारो इच्छुकांनी गर्दी केली आहे. शिवसेनेकडून आज इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात २४०० हून अधिक इच्छुकांनी मुलाखत दिल्याची माहिती शिवसेना नेते व माजी खासदार राहुल शेवाळे* यांनी दिली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना उपनेत्या व प्रवक्त्या शीतल म्हात्रे उपस्थित होत्या.

उपनेते राहूल शेवाळे म्हणाले की,महापालिका निवडणुकीत शिवसेना पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी हजारो इच्छुक आहेत. पालिका निवडणूक शिवसेना महायुती म्हणूनच लढणार आहे मात्र निवडणुकीत योग्य उमेदवार असावा यासाठी पक्षाकडून आज रंगशारदा येथे मुलाखत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबईतील लोकसभा मतदार संघनिहाय इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. पक्षाकडून प्रत्येक लोकसभा क्षेत्रासाठी तीन




निरीक्षकांची यासाठी नियुक्ती करण्यात आल्याचे शेवाळे म्हणाले.

मुंबईत सर्व पक्षांनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या पण कोणालाही इतका प्रचंड प्रतिसाद मिळाला नाही जो शिवसेनेला मिळाला असे शेवाळे म्हणाले.

२२७ वॉर्डसाठी २४०० हून अधिक जणांनी मुलाखत दिली आहे. यात मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातील पदाधिकाऱ्यांनी सुद्धा आज शिवसेना पक्षासाठी मुलाखती दिल्याचे ते म्हणाले.

अडीच वर्ष मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी राज्यात आणि मुंबईत केलेल्या विकास कामांनी एक प्रभावी छाप पाडली आहे.

त्यामुळे शिवसेनेला विजयाची खात्री आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे यांचा जनमानसात प्रभाव असल्याने शिवसेनेला इच्छुकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# मंत्रालय-विधान भवन भेटीतून येरगी येथील बालिका पंचायतला प्रशासनाची ओळख

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे :** देगलूर(दि.१९) मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान योजने अंतर्गत महिला सक्षमीकरण करण्यासाठी आणि महिला सक्षमीकरणातून सशक्त राष्ट्रनिर्मितीचा भक्कम पाया निर्माण करण्यासाठी देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथील बालिका पंचायत राज समितीने १२ ते १६ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुंबई येथे भव्य व प्रेरणादायी अभ्यास दौरा आयोजित केला.

चालुक्यकालीन ऐतिहासिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येरगी गावातील किशोरवयीन मुलींना राज्याच्या प्रशासनिक,राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे,या उद्देशाने हा दौरा आयोजित करण्यात आला होता.

येरगी येथील सरपंच संतोष पाटील येरगीकर यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या अभ्यास दौऱ्यात बालिका पंचायत राज समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथील मंत्रालय,विधान भवन तसेच इतर महत्त्वाच्या शासकीय व पर्यटन स्थळांना भेटी दिल्या. राजधानीतील



प्रशासन कसे चालते,धोरणात्मक निर्णय कसे घेतले जातात,लोकशाही व्यवस्थेतील विविध घटकांची भूमिका काय असते,याची सखोल माहिती या दौऱ्यातून मुलींना मिळाली.

बालिका पंचायत राज येरगीच्या युवा पदाधिकाऱ्यांना राजकीय,सामाजिक व प्रशासकीय कामकाजाची जाणीव व्हावी,नेतृत्वगुण विकसित व्हावेत आणि भविष्यातील सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून त्या घडाव्यात,या हेतूने या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.मंत्रालय व विधान भवन परिसरात प्रत्यक्ष पाहणी व माहिती सत्रामुळे शासन-प्रशासनाची कार्यपद्धती समजून घेण्याची अनोखी संधी मुलींना लाभली.

या दौऱ्यात सरपंच संतोष पाटील यांच्यासह शाळेचे सहशिक्षक आकाश राजुरे, सहशिक्षिका वैशाली जाधव-सागावे यांनी विशेष सहकार्य केले.येरगी येथे ०४ फेब्रुवारी २०२३ रोजी बालिका पंचायतची स्थापना झाली.

तेव्हापासून या समितीतील किशोरवयीन युवती गावपातळीवर विविध सामाजिक विषयांवर प्रबोधन करतात,दर रविवारी स्वच्छता मोहिमा राबवतात आणि लोकजागृतीसाठी पुढाकार घेतात.ग्रामपंचायतीच्या पाठबळावर स्थापन झालेल्या या बालिका पंचायतमध्ये सरपंच, उपसरपंच अशी पदरचना असून सुमारे एकोनीस किशोरवयीन मुली यात सक्रिय सहभागी आहेत.नांदेड जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांना भेटी देत प्रशासनाचे कामकाज समजून घेणारी आणि जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट बालिका पंचायत म्हणून ओळख निर्माण करणारी येरगीची बालिका पंचायत,आता मुंबई अभ्यास दौऱ्यामुळे राज्यस्तरीय प्रशासनाची ओळख करून घेण्यात यशस्वी ठरली आहे.हा दौरा म्हणजे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल असून,उद्याच्या सक्षम नेतृत्वाची नांदी असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.या दौऱ्यामुळे सरपंच संतोष पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा केसलवाडा

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/जिल्हा प्रतिनिधी गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यात अटल क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सव सुरू असून आयोजनाचे हे सलग तिसरे वर्ष असून मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असतांना हा महोत्सव सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जिल्हा परिषद शाळांचा स्नेह संमेलन सोहळा खासगी शाळेप्रमाणे झाला पाहिजे हा उद्देश यामागे होता. नुकत्याच केंद्र स्तरीय स्पर्धा संपन्न झाल्या असून आता तालुका स्तरीय स्पर्धा सुरू झाल्या आहेत. नंतर जिल्हा स्तरीय स्पर्धा होणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध झाले असून शिक्षणासोबत इतर कलागुणांना देखील वाव मिळणार आहे. याच अनुषंगाने आज पीएम




श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा केसलवाडा येथे तिरोडा तालुका स्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा उद्घाटन सोहळा क्षेत्राचे आमदार मा. श्री. विजयभाऊ रहांगडाले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उपस्थित होतो.

दरम्यान सौ. रजनीताई कुंभरे सभापती जि. प. गोंदिया, श्री. तेजरामजी चव्हाण सभापती पं.स. तिरोडा, उपसभापती सौ. सुनंदाताई पटले, जि. प. सदस्य सौ. तुमेश्वरीताई बघेले, सौ. माधुरीताई रहांगडाले, श्री. चत्रभुजजी बिसेन, श्री. प्रवीणजी पटले, सौ. कुंताताई पटले, श्री. हुपराज जमईवार, सौ. प्रमिलाताई भलावी, श्री. चेतलाल भगत, सौ. रीताताई पटले, श्री. दिपकजी कुकडे, सौ. दिपालीताई टेंभेकर, श्री. जितेंद्रजी रहांगडाले, सौ. गंगाबाई मलेवार, श्री. महेशजी आंबेकर, श्री. अविनाशजी कुकडे, श्री. रवींद्रजी वहिले, श्री. उत्तमजी कुकडे, श्री. प्रीतीलालजी कुकडे तसेच तिरोडा तालुका अंतर्गत शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# नांदेडमध्ये बांधकाम कामगार निधीचा गैरवापर; ७९ लाखांच्या अपहारप्रकरणी गुन्हे दाखल करण्याचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सय्यद ईसा :** ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या निधीतून बोगस कामगारांच्या नावावर ७९ लाख ६९ हजार रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश छत्रपती संभाजीनगरचे कामगार उपायुक्त श्री. नि. पा. पाटणकर यांनी सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांना दिले आहेत.

हा घोटाळा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नांदेड जिल्हा सचिव मंडळ सदस्य तथा सीटूचे जिल्हा जनरल सेक्रेटरी कॉ. गंगाधर गायकवाड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे उघड झाला आहे. बोगस बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण



व लाभ वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे.तपासात नांदेड येथील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने ८९४ मूळ बांधकाम कामगारांचा डेटा बदलून आर्थिक हितसंबंधातून बोगस नावे नोंदवली. या माध्यमातून ९२६ अर्ज सादर करण्यात आले, त्यापैकी ५८९ अर्ज मंजूर करून संबंधित लाभ वितरित करण्यात आले.या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून अहवाल मंडळास सादर करण्याचे, तसेच बेकायदेशीररीत्या वितरित करण्यात आलेली रक्कम त्वरित वसूल करून मंडळाच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणातील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल १५ दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी पुढील काळातही पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे कॉ. गंगाधर गायकवाड यांनी सांगितले.

# भक्तीतून शक्ती! धावड्यात रामानंद संप्रदायाने उभारला लोकसहभागातून वनराई बंधारा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** केवळ पोथी-पुराणात न रमता प्रत्यक्ष कृतीतून 'जल' सेवा करणे, हाच खरा धर्म असल्याचे धावडा (मुर्डेश्वर)येथील रामानंद संप्रदायाने दाखवून दिले आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर, खालावणारी भूजल पातळी रोखण्यासाठी संप्रदायाने लोकसहभागातून एक भव्य 'वनराई बंधारा' उभारला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अध्यात्माला समाजसेवेची जोड रामानंद संप्रदायामार्फत केवळ धार्मिक विधी न राबवता दरमहा सामाजिक उपक्रम राबविले जातात. नोव्हेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केल्यानंतर, आता डिसेंबरमध्ये ग्रामस्थांच्या मदतीने हा बंधारा पूर्ण करण्यात आला. परिसरातील विहिरींची पाणीपातळी वाढावी आणि स्थानिक शेतकऱ्यांसह पशु-पक्ष्यांच्या पाण्याचा प्रश्न मिटावा, हा यामागचा शुद्ध हेतू आहे.श्रमदानाची मोठी परंपरा या बंधाऱ्यासाठी गावातील महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने



एकत्र येत श्रमदान केले. 'गावचा विकास, गावच्या हातांनी' ही भावना यावेळी दिसून आली. संप्रदायाने यापूर्वी आरोग्य शिबिरे, रक्तदान आणि मोफत रुग्णवाहिका अशा अनेक सेवांमधून आपली सामाजिक बांधीलकी जपली आहे. येणाऱ्या काळात गरजू महिलांना शिलाई मशीन आणि शेतकऱ्यांना अवजारे देण्याचा मानसही संप्रदायाने व्यक्त केला आहे. अध्यात्माची सांगड जेव्हा निसर्ग संवर्धनाशी घातली जाते, तेव्हा गावाचा कायापालट होतो, याचाच प्रत्यय धावडा वासीयांना या निमित्ताने आला आहे.

# प्रशांत गावंडे यांना महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल कडून अवार्ड ऑफ एक्सलन्स(AWARD OF EXCELLENCE) देऊन सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशे महागाव (यवतमाळ) :** जागतिक फार्मासिस्ट दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद (Maharashtra State Pharmacy Council) यांनी महाराष्ट्र मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे फार्मासिस्ट, फार्मसी कॉलेज, असोसिएशन, याची निवड दरवर्षी करण्यात येते. यावेळी पुसद येथील जय संतोषी मेडिकल अँड स्टोअर्स चे संचालक तथा विविध सामाजिक कार्यात भाग घेणारे प्रशांत निळकंठराव गावंडे यांची वैयक्तिक फार्मासिस्ट म्हणून अमरावती विभागातून प्रथम क्रमांकाची निवड करून त्यांना यावर्षीचा "अवार्ड ऑफ एक्सलन्स" देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले , औषध साक्षरता ग्रामीण भागात राबवून औषधी विषयी जनजागृती करण्याचे त्यांचे मोठे काम आहे, खास करून जिल्हा परिषदेतल्या प्रत्येक शाळेत जाऊन ते औषध साक्षरता मोठ्या प्रमाणात राबवत असतात. यासोबत पर्यावरणवादी ,शैक्षणिक सामाजिक असंख्य उपक्रमाची त्यांच्या नावाची मोठी नोंद आहे. जिल्हा परिषदेची शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ते अहोरात्र काम करतात, सातपुडा एज्युकेशन, व सातपुडा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी च्या अध्यक्षा डॉ. स्वातीताई वाकेकर, महाराष्ट्र



राज्य औषध व्यवसाय परिषद DIC प्रमुख गणेश बंगळे, यवतमाळ जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष पंकज नानवाणी, सचिव संजय बुरले, सातपुडा इन्स्टिट्यूट फार्मसी चे प्राचार्य डॉ. शैलेश भरड , DIC अवार्ड कॉर्डिनेटर भूषण माळी यांच्या हस्ते श्री संत गजानन महाराज नगरी शेगाव येथील सातपुडा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेज या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते प्रशांत गावंडे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या अगोदर सुद्धा प्रशांत गावंडे यांना राज्याचे अन्न व औषधी प्रशासनाचे तत्कालीन सनदी अधिकारी ,आयुक्त महेश झगडे यांच्या हस्ते "फार्मा गौरव पुरस्कार" देऊन गौरवण्यात आले, सलाम मुंबई फाउंडेशन , सेवाभावी संस्था, विविध संघटने द्वारा प्रशांत गावंडे यांना विविध पुरस्कार मिळण्याची नोंद आहे, सर्व क्षेत्रात सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग असतो, कोल्हापूर सांगली येथील पूरग्रस्त साठी त्यांनी सात दिवस कॅम्प लावून पूरग्रस्त भागात मोठी सेवा दिली हे प्रामुख्याने नमूद करण्यात येते, स्व. जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटी द्वारे ते ग्रामीण ,अतिदुर्गम ,शहरी भागात विविध उपक्रम करतात,पुरस्कार समारंभी विविध क्षेत्रातील मान्यवर फार्मसी कॉलेज चे प्राचार्य प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते. या महत्त्वाच्या पुरस्कारामुळे प्रशांत गावंडे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# उरण तालुका विज्ञान प्रदर्शनात आर के एफ जे एन पी व्ही माध्यमिक विभागाला घवघवीत यश

## सर्वाधिक ८ बक्षीसांची मानकरी आर के एफ जे.एन.पी.व्ही शाळा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** उरण तालुका विज्ञान प्रदर्शनात आर.के. एफ. जे. एन. पी. व्ही. शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध विज्ञानावर आधारित असलेल्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन शाळेचे नाव उंचावले आहे. आर के एफ शाळेला सर्वाधिक ८ बक्षिसे मिळवून शाळेच्या शैक्षणिक प्रगती मध्ये मानाचा तुरा खोवला आहे. या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांनी सहभाग नोंदवला होता विविध विषयावर आधारित झालेल्या या स्पर्धेत प्रभावीपणे वैज्ञानिक दृष्टिकोनातून सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा त्यांच्या कल्पकतेला



वाव मिळावा याकरता शाळा नेहमीच प्रयत्नशील असते. हे यश विद्यार्थ्यांनी त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांच्या मेहनतीचे फळ आहे. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे : समृद्धी समाधान पन्हाळे (मराठी माध्यम) गट : ६ ते ८वर्ष स्पर्धा प्रकार : निबंध प्रथम क्रमांक, समृद्धी समाधान पन्हाळे (मराठी माध्यम) गट: ६ ते ८ वर्ष स्पर्धा प्रकार :वकृत्व द्वितीय क्रमांक, स्वरा समीर कांबळे ( मराठी माध्यम )गट ९ ते १२वर्ष स्पर्धा प्रकार निबंध उत्तेजनार्थ, गायत्री गणेश भामरे (इंग्रजी माध्यम ) गट ९ ते १२ वर्षे स्पर्धा प्रकार निबंध प्रथम क्रमांक, अंश सुदामा रोथान (इंग्रजी माध्यम) गट :६ते ८ वर्ष स्पर्धा प्रकार प्रश्नमंजुषा द्वितीय क्रमांक, अंश सुदामा रोथान (इंग्रजी माध्यम) गट ६ ते ८वर्ष स्पर्धा प्रकार निबंध उत्तेजनार्थ, मानसी किशोर गुरव (इंग्रजी माध्यम ) गट :शिक्षक ,स्पर्धा प्रकार: शैक्षणिक साहित्य निर्मिती द्वितीय क्रमांक, किशोर म्हात्रे (इंग्रजी माध्यम) गट: शिक्षक ,स्पर्धा प्रकार शैक्षणिक साहित्य निर्मिती सहभाग,या स्पर्धेसाठी मार्गदर्शक शिक्षक (माध्यम मराठी )प्रमिला पवार, सतीश गावंड ,किशोर म्हात्रे, (इंग्रजी माध्यम) स्वाती कुवर, मंजुळा गावडा, मानसी गुरव त्याचप्रमाणे शाळेच्या उज्वल यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष मा. रविंद्र इंदुलकर सर, शाळेच्या प्रशासकीय अधिकारी मोनिका रतन पर्ज मॅडम, शाळेचे मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील सर, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव सर ,अंकुश जोगळे सर ,शाळेचे पर्यवेक्षक जगदीश मढवी सर आणि श्रीमती चंदा टेमकर मॅडम ,शाळेच्या स्कूल कॉर्डिनेटर सुजा शिवरामन मॅडम तसेच विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा देणारे प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रमाकांत गावंड सर, बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका वैशाली बोरचटे मॅडम या सर्वांनी यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले त्याचप्रमाणे उरण तालुका गटशिक्षणाधिकारी मा. निर्मला मच्छिंद्रनाथ घरत मॅडम यांनी शाळेला सर्वाधिक बक्षिसे मिळाल्याबद्दल शाळेचे विशेष अभिनंदन केले आहे.

# श्रीवर्धन बाजारपेठेत भरधाव थारचा कहर; स्थानिक तरुणाचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** रायगड जिल्ह्यातील पर्यटननगरी श्रीवर्धन येथे समुद्राकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर भरधाव आणि बेफिकीर वाहनचालकांमुळे पुन्हा एकदा भीषण अपघात घडला असून, या घटनेत परवेज हमदुले या स्थानिक तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पुण्याहून फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या काळ्या रंगाच्या थार जीपने (क्रमांक एम.एच. १२ व्ही.डब्ल्यू. ८०५५) चुकीच्या बाजूने येत दोन दुचाकींना जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की परवेज हमदुले यांना सुमारे ४० फूट फरफटत नेण्यात आले. डोक्याला गंभीर मार



लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर घटनास्थळी रक्तरंजित दृश्य पाहायला मिळाले.पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, थार जीपमधील चारही पर्यटक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अपघातानंतर परिसरात प्रचंड संतापाची लाट उसळली. स्थानिक नागरिकांनी मोठी गर्दी करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. संतप्त जमावाने काही काळ रस्ते रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र श्रीवर्धन पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

श्रीवर्धन पोलिसांनी थार जीपमधील सर्व युवकांना ताब्यात घेतले असून, चालकाविरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मद्यपान करून वाहन चालवले का, याबाबत वैद्यकीय तपासणीसह सखोल चौकशी केली जात आहे.घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पर्यटनस्थळी वाढत्या हुल्लडबाजी आणि बेदरकार वाहनचालना विरोधात कडक कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे. निष्पाप जीव गमावण्याच्या या घटनेमुळे संपूर्ण श्रीवर्धन शहरात शोककळा पसरली आहे.

# प्रशासनात गतिमानता व समन्वयावर भर द्यावा - विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

## विभाग प्रमुखांची जिल्हास्तरीय आढावा बैठक

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** शासनाच्या प्रत्येक योजना व निर्णयांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचला पाहिजे. सर्व विभागांनी वेळेचे काटेकोर पालन, पारदर्शकता व परस्पर समन्वय राखून काम करावे. प्रलंबित प्रकरणे कमी करणे, तक्रारींचा तातडीने निपटारा करणे आणि गुणवत्तापूर्ण विकासकामांवर भर देणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकारी व कर्मचारी यांनी जबाबदारीने व संवेदनशीलतेने कार्य करावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले.

जिल्ह्यातील प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांची सविस्तर आढावा बैठक नुकतीच पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या.

या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात येऊन शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा आणि प्रशासनातील समन्वय बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला.बैठकीस जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, सहाय्यक परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजीत वायकोस, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रत्येक विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागातील चालू योजनांची प्रगती, अडचणी तसेच पुढील कालावधीतील नियोजनाची माहिती सादर केली.



विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आढावा घेताना शासनाच्या सर्व योजना लाभार्थ्यांपर्यंत वेळेत व प्रभावीपणे पोहोचविण्याचे निर्देश दिले. कामकाजात पारदर्शकता, वेळेचे काटेकोर पालन आणि विभागांमधील समन्वय वाढविणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करून सेवा वितरणात गती आणण्यावर त्यांनी भर दिला. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले , शासनाच्या सर्व योजना व उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशासनातील सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. नागरिककेंद्रित सेवा वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने देणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट असून, प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यावर भर देण्यात येत आहे. विकासकामे ठरवून दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर यांनी जिल्ह्यातील प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. जिल्ह्यातील विकास प्रकल्प, मूलभूत सुविधा, पर्यावरण संरक्षण तसेच लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत अधिकाधिक कार्यक्षमता आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# आम आदमी पार्टी पनवेल महापालिका निवडणुकीत सर्व जागा स्वबळावर लढवणार : महानगर अध्यक्ष रुपेश कदम

### पक्षाचे तिकीट पूर्णपणे नि:शुल्क, उमेदवारांना जाहीरनामा व प्रचारसाहित्य देखील पक्षाकडून मिळणार मोफत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत आम आदमी पक्ष स्वबळावर सर्व जागा लढवणार असल्याचे सुतोवाच आम आदमी पार्टीचे महानगर अध्यक्ष रुपेश कदम यांनी केले आहे. आम आदमी पक्ष येणाऱ्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत नेहमीप्रमाणे सुशिक्षित आणि स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार देणार आहे. तर दिल्ली आणि पंजाब सरकारप्रमाणे उत्तम शिक्षण, उत्तम आरोग्य, चांगले रस्ते अशा मूलभूत मुद्द्यांवर इथली निवडणूक आम्ही लढवणार असल्याचे आम आदमी पार्टीचे महानगर अध्यक्ष रुपेश कदम यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले. आम आदमी पार्टी यांच्यातर्फे पनवेल महापालिका हद्दीत विविध विषयावर आंदोलने, उपोषणे, मोर्चे काढण्यात आलेले असून दरवेळी सर्वसामान्य लोकांच्या पाठीमागे आम आदमी ठामपणे राहिली असून त्यांच्या समस्या सोडवण्याचे काम देखील आम आदमी पार्टीने केले असल्याचे रुपेश कदम यांनी सांगितले आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत असलेली आम आदमी पार्टी पनवेल महापालिकेत मात्र स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याने महाविकास आघाडीला फटका बसणार अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर पार्टी अध्यक्ष अरविंद केजरीवाल स्वतः व पंजाबचे मुख्यमंत्री भगवान मानसिंग, राज्यसभा सदस्य संजय सिंग, राज्यसभा सदस्य राघव चड्डा, माजी मुख्यमंत्री दिल्ली आतिशी मार्लेना, आम आदमी पार्टीचे सदस्य व आमदार सौरभ भारद्वाज आदी तगड्या नेत्यांची फळी प्रचारासाठी उपस्थित राहणार असून पनवेल महापालिका निवडणुकीत आम आदमी पार्टीच्या पक्षाचे तिकीट पूर्णपणे नि:शुल्क असणार असून सर्व उमेदवारांना जाहीरनामा व प्रचारसाहित्य देखील पक्षाकडून मोफत देणार येणार असल्याचे महानगर अध्यक्ष रुपेश कदम यांनी यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

# वाघाची डरकाळी ऐकली, आता बिबट्याचा 'नजरनामा' वाचा! सिल्लोडमधून वनमंत्र्यांना धाडले अनोखे निवेदन; मानवी अतिक्रमणावर बिबट्याचा 'प्रहार'

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** "तुमचा 'हात' आमच्या जंगलात शिरला, म्हणूनच आमचा 'पाय' तुमच्या दुनियेत पडतोय. ही आमची शिकार नाही, तर आमचा अधिकार आणि तुमच्या अतिक्रमणाविरुद्धचा टाहो आहे!" अशा जळजळीत आणि काळजाला भिडणाऱ्या शब्दांत सिल्लोड येथील वन्यजीव संवर्धक डॉ. संतोष पाटील यांनी चक्क बिबट्याची कैफियत प्रशासनासमोर मांडली आहे. सध्या राज्यात मानव-बिबट्या संघर्ष शिगेला पोहोचला असताना, बिबट्याच्या नसबंदीपेक्षा मानवाच्या हव्यासाची नसबंदी कधी करणार, असा रोकडा सवाल या निवेदनातून विचारला असून त्याची चर्चा आता मंत्रालयापर्यंत पोहोचली आहे. सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे



उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांनी वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक यांच्यासह उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांची भेट घेऊन वनमंत्री गणेश नाईक यांना ईमेलद्वारे हे गाऱ्हाणे मांडले आहे. या निवेदनाचे वैशिष्ट्य म्हणजे, यात डॉ. पाटील यांनी स्वतः बिबट्याचा प्रतिनिधी म्हणून भूमिका मांडली आहे. जंगलात मानवाचा वाढता हस्तक्षेप, बेसुमार वृक्षतोड आणि निसर्ग साखळीत मानवाने केलेला बिघाड यामुळेच आज बिबट्या शेतात आणि गावात दिसत आहे. बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्याच्या मागणीपेक्षा, जंगलात घुसखोरी करणाऱ्या मानवालाच पिंजरा लावून त्यांच्या मूळ गावी का पाठवू नये, हा डॉ. पाटील यांचा उपरोधिक सवाल प्रशासकीय यंत्रणेला विचार करायला लावणारा आहे.

राज्यात ३३ टक्के राखीव वनक्षेत्राचा नियम केवळ कागदावरच असून, प्रत्यक्ष जमिनीवर मात्र सिमेंटची जंगले उभी राहत आहेत. आमचा अधिवास नष्ट झाला, आमची नैसर्गिक अन्नसाखळी विस्कळीत झाली, तर आम्ही जायचे कुठे? असा प्रश्न बिबट्याच्या वतीने विचारण्यात आला आहे. गावात साचणारा कचरा, उघड्यावरची हागणदारी आणि मानवाकडून होणारी चोरटी शिकार यामुळे वन्यजीव नैसर्गिक अधिवास सोडून वस्तीकडे वळत असल्याचे वास्तव यात अधोरेखित केले आहे. दहा लाख वर्षांपूर्वी सुरू झालेला मानवाचा प्रवास आज निसर्गाचा घास घेण्यापर्यंत पोहोचला आहे. साडेतीनशे वर्षांत दुपटीने वाढलेली मानवी लोकसंख्या हीच पर्यावरणाची शत्रू ठरत असून, आता नेमकी नसबंदी कोणाची करायची, हा प्रश्न डॉ. संतोष पाटील यांनी या निमित्ताने उपस्थित केला आहे.प्रशासनाने केवळ पिंजरे लावून प्रश्न सोडवण्यापेक्षा, जंगलांचे पुनरुज्जीवन करावे आणि मानवाला निसर्गाच्या मर्यादेची जाणीव करून द्यावी, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. डॉ. पाटील यांनी मांडलेला हा 'बिबट्याचा आवाज' केवळ एक निवेदन नसून तो निसर्गाचा अंतिम इशारा मानला जात आहे. आता प्रशासन याकडे संवेदनशीलतेने पाहणार की केवळ कागदी घोडे नाचवणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# अवैध दारू, गुटखा व मटका-जुगार तात्काळ बंद करा; नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**पुर्णा (प्रतिनिधी)/शिवाजी लोंढे :** पुर्णा शहर व तालुक्यातील विविध भागांमध्ये अवैध देशी-विदेशी दारू विक्री, गुटखा व तंबाखूची मोठ्या प्रमाणावर साठेबाजी तसेच मटका-जुगार अड्डे बिनधास्त सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या सर्व बेकायदेशीर धंद्यांना काही पोलीस कर्मचारी व स्थानिक दलालांचे छुपे संरक्षण मिळत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या अनधिकृत व्यवसायांमुळे शहरातील युवकवर्ग मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन होत असून, त्याचा थेट परिणाम कुटुंबव्यवस्थेवर दिसून येत आहे. व्यसनांच्या आहारी गेल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असून, कौटुंबिक हिंसाचार, चोरी, भांडणे यासारख्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. कामगारवर्गाच्या आरोग्यावरही याचे गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, पोलिसांकडून कारवाईऐवजी या धंद्यांकडून मोठ्या प्रमाणावर हप्ते वसुली सुरू असल्यानेच हे अड्डे निर्धास्तपणे चालू आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**नागरिकांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :**

पुर्णा शहर व तालुक्यातील सर्व अवैध दारू विक्री अड्ड्यांवर तात्काळ छापे टाकावेत.

गुटखा व तंबाखू साठवणूक करणाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करावी.

मटका-जुगार अड्डे उद्ध्वस्त करून संबंधित गुन्हेगारांवर कडक कारवाई करावी.

या अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करावी.

नागरिकांच्या सहकार्याने विशेष मोहीम राबवून कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी.

जर प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलली नाहीत, तर नागरिकांकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. पुर्णा शहरातील शांतता व युवकांचे भवितव्य वाचवण्यासाठी प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जीवनगौरव पुरस्कार देऊन कोमसापने नवी उर्जा दिली : ज्येष्ठ कवयित्री वसुधा नवाळी

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर :** माझ्या ८७ व्या वर्षी मी कार्यक्षेत्रात केलेल्या काव्य लेखनाची दखल घेऊन एक ज्येष्ठ कवयित्री या नात्याने मला जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले त्यामुळे भविष्यात काव्यलेखन करण्याची ऊर्जा कोमसाप उरणने दिली आहे असे विचार ज्येष्ठ कवयित्री वसुधा नवाळी यांनी मधुबन कट्ट्यावरील कविसंमेलनात काढले.यावेळी दुसरे जीवनगौरव पुरस्कार प्राप्त व्यक्तिमत्त्व गायक कवी रमेश थवई यांनी ही आपल्या भाषणात कोमसापच्या कार्याचा गौरव करून,केल्या सत्काराबाबत आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुरेश मेस्त्री होते. प्रमुख उपस्थितीत साहित्यरत्न प्रा.एल.बी. पाटील,तालुका शिक्षण ग.शिक्षणाधिकारी निर्मला घरत, मच्छिंद्र घरत,

सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम,निळवर्ण दत्ताराम, साहेबराव ओहोळसर,मधुबन कट्टा अध्यक्ष राम म्हात्रे,आर.सीगावंड,नरेश ठाकूर इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे तर सुरेख



सूत्रसंचालन संजय होळकर यांनी केले. हा कार्यक्रम विमलातलाव उरण येथे १७/१२/२५रोजी संपन्न झाला.

"म्हणींवर माझी कविता " या विषयावरील कविसंमेलनात भरत पाटील,रमण पंडित, रामचंद्र म्हात्रे, संजीव पाटील, संपदा ठाकूर,वसुधा नवाळी, मारुती तांबे, शिवप्रताप पंडित, म.का. म्हात्रे,नरेश पाटील, संग्राम तोगरे,साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी.इत्यादीं कवींच्या दर्जेदार कवितांनी श्रोत्यांना भरपूर आनंद दिला.

# ग्रामपंचायतींकडून स्वच्छ, पारदर्शक व लोकाभिमुख कामकाज करून घेण्याची जबाबदारी ग्रामस्थांचीच आहे - विकास क्षत्रिय,माहिती अधिकार तथा सामाजिक कार्यकर्ते

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** जोपर्यंत स्थानिक ग्रामस्थ प्रत्येक कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवत नाहीत, तोपर्यंत ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या १०० रुपयांपैकी काहीच रुपये प्रत्यक्ष विकासासाठी खर्च होत राहतील हे कटू सत्य आहे. ही परिस्थिती आज काही अपवाद वगळता अनेक गावांत प्रत्यक्ष अनुभवायला मिळते.प्रत्येक गावात दरवर्षी लाखो रुपयांचा विकास निधी येतो. मात्र,हा निधी नेमका कुठे जातो? या प्रश्नाचं उत्तर बहुतेक वेळा"माहित नाही" असंच मिळते. रस्ते, शाळा, पाणीपुरवठा, शौचालये, गटारे,सांडपाणी व्यवस्थापन, घरकुल योजना,जलजीवन मिशन यांसारख्या योजना कागदावर झळकतात;पण त्याचा प्रत्यक्ष लाभ सामान्य ग्रामस्थांपर्यंत पोहोचतो का,हे कायमच संशयास्पद असतं.अनेक ग्रामपंचायतींमध्ये गटार दुरुस्ती,साफसफाई,कचरा व्यवस्थापन,बल्ब बदल, औषध खरेदी,बोगस मजूर नोंदी (मस्टर),बनावट बिलं अशा विविध मार्गांनी निधीचा अक्षरशः अपहार केला जातो. हा पैसा कोणाचा आहे?तो जनतेच्या करातून आलेला, गावाच्या विकासासाठीचा पैसा आहे.गावाचा विकास निधी आंधळेपणाने नव्हे,तर पूर्ण पारदर्शकतेने खर्च झाला पाहिजे. प्रत्येक ग्रामपंचायतीने खालील गोष्टी करणे बंधनकारक आहे:

**वार्षिक प्राप्त व खर्चाचा संपूर्ण तपशील**

ग्रामपंचायत कार्यालयाच्या सार्वजनिक फलकावर लावणे किती निधी आला, कोणत्या योजनेत गेला,कुठे काम झाले, किती खर्च झाला हे प्रत्येक नागरिकाला समजेल अशा भाषेत मांडणे दर



महिन्याला "जनतेची हिशोब बैठक" घेणे, ज्यामध्ये सरपंच व ग्रामसेवक ग्रामस्थांसमोर प्रत्यक्ष अहवाल देतील गावातील युवकांनी, महिला बचतगटांनी "आणि जागरूक नागरिकांनी मिळून "निधी तपासणी समिती" तयार करावी. प्रत्येक कामाची प्रत्यक्ष पाहणी करणे, गुणवत्तेची तपासणी करणे आणि प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि तो वापरणे ही जबाबदारीही आहे.रस्ते, टाक्या,नाले,गटारे,शाळा, शौचालये ही कामे फक्त पूर्ण झाली म्हणजे संपली असं नसतं.त्यांची तपासणी, देखभाल आणि गुणवत्ता अहवाल महत्त्वाचा असतो. प्रत्येक कामाचे फोटो, मोजमाप,खर्च तपशील ग्रामसभेत मांडले गेले पाहिजेत. ठेकेदाराने काम पूर्ण केलं म्हणजे काम योग्यच झालं,हा गैरसमज मोडीत काढण्याची वेळ आली आहे. प्रत्येक गावाने जनतेच्या गरजांवर आधारित पाच वर्षांचा विकास आराखडा तयार केला पाहिजे. पाणी, आरोग्य,शिक्षण,रस्ते,गटारे, शेतकरी सुविधा यांना प्राधान्य देऊन निधीची मागणी व्हायला हवी. योजना राजकीय दबावातून नव्हे,तर लोकहितातून यायला हव्यात. सरपंच आणि ग्रामसेवक ही पदे सत्तेसाठी नसून जबाबदारीसाठी आहेत. निधीचा गैरवापर,अपारदर्शक व्यवहार किंवा दुर्लक्ष झाल्यास ग्रामसभा ठरावाद्वारे कार्यवाहीची शिफारस करता येते. प्रत्येक खर्चाची नोंद ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक असावे, जेणेकरून कोणताही नागरिक ती पाहू शकेल. हिशोब द्यायचा नाही" ही वृत्ती संपली पाहिजे.गाव बदलायचं असेल, तर बदलाची सुरुवात आपल्यापासून करावी लागते. मतदान करताना फक्त ओळख नव्हे,तर उमेदवाराचा प्रामाणिकपणा,ज्ञान आणि हेतू ओळखून निर्णय घ्यावा. काम सुरू असताना नागरिकांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी, फोटो काढावेत,प्रश्न विचारावेत,"ही योजना आमच्या गावात आली का?" हा प्रश्न विचारणं भीती नाही,तो नागरी अधिकार आहे.जर प्रत्येक गावाने ही जनसहभागाची पद्धत स्वीकारली,तर १०० रुपयांतून काहीच रुपये कामासाठी जातात" हा गैरसमज संपेल आणि १०० पैकी १०० रुपये प्रत्यक्ष गावाच्या विकासासाठी वापरले जातील.

# टॅक्स भरताय अन् रेशनही लाटताय? सिल्लोडमधील २ हजार 'श्रीमंत' गरिबांवर कारवाईची तलवार!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील श्रीमंत आणि आयकरदाते असूनही गरिबांच्या हक्काचे रेशन लाटणाऱ्या नागरिकांविरोधात आता प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही नियमांचे उल्लंघन करून रेशन धान्य घेणाऱ्या २ हजार रेशन कार्डधारकांना तहसील कार्यालयाने आता शेवटचा इशारा दिला आहे. स्वतःहून नावे कमी न केल्यास संबंधित करदात्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल




करण्यात येणार असल्याचे संकेत पुरवठा विभागाने दिले आहेत.

राज्य शासनाच्या नियमानुसार, ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा जे आयकर भरतात, अशा नागरिकांना सवलतीच्या दरातील रेशन नाकारण्यात आले आहे. महसूल प्रशासनाने केलेल्या तपासणीत सिल्लोड तालुक्यात असे तब्बल २ हजार ३०२ रेशन कार्डधारक आढळले आहेत, ज्यांची सदस्य संख्या ७ हजार २० इतकी आहे. मार्च २०२५ पासून सुरू झालेल्या या शोधमोहिमेत आतापर्यंत केवळ ३०१ कार्डधारकांनी आपली नावे कमी केली आहेत. मात्र, अद्यापही २ हजार कार्डधारक प्रशासनाला न जुमानता रेशनचा लाभ घेत आहेत.

या पार्श्वभूमीवर, नायब तहसीलदार बळीराम मुंडे यांनी स्पष्ट केले आहे की, आयकर भरणाऱ्या नागरिकांनी तत्काळ पुरवठा विभागाशी संपर्क साधून आपली नावे कमी करावीत आणि 'शुभ्र रेशन कार्ड' प्राप्त करून घ्यावे.

या कार्डावर धान्य मिळत नसले तरी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसारखे इतर शासकीय लाभ घेता येतात.

मात्र, जर माहिती लपवून रेशन लाटण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला, तर कडक कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी

वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये

डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

## थोडक्यात

### सुरगाणा महाविद्यालयात अल्पसंख्याक दिन साजरा




**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक दिवस साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाला प्रा.बी.डी.धुम, प्रा.कृष्णा गांगोडे,प्रा.विलास जोपळे, प्रा.केशव गावित, गिरीधर भालेराव, हेमंत चौधरी, मिलिंद पवार, ओमकार धुम धुम यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्युत पुरवठा तोडून वीज ग्राहकाला बसविले अंधारात

**दैनिक युवक आधार**

**जालना (अशोक ठोके) :** महावितरणच्या परतूर येथील उपविभागातील अधिकाऱ्यांकडून ग्राहकाला अरेरावीची भाषा करत कार्यवाही केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणामुळे संपूर्ण कुटुंबाला अंधारात राहावे लागल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.1एप्रिल रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता महावितरणचे कर्मचारी अचानक ग्राहक राजेश देसाई यांच्या घरी आले. अधिकाऱ्यांची नावे विचारताच अरेरावीची भाषा वापरत, कोणतीही लेखी नोटीस, पंचनामा किंवा साक्षीदारांशिवाय वीज मीटर जबरदस्तीने जप्त करून नेण्यात आले. मीटर तपासणीचे कारण देत ४ एप्रिल २०२५ रोजी देसाई यांना जालना कार्यालयात बोलावण्यात आले. मात्र 'पुढे बिल येईल' एवढेच सांगून कोणताही मीटर टेस्ट रिपोर्ट, तपासणीचा तपशील किंवा दोषाची माहिती न देता त्यांना परत पाठवण्यात आले. त्यानंतर २८ जून १ लाख ४३ हजार ५०० रुपयांचे वीज चोरीचे बिल देण्यात आले. देसाई यांनी ३० जून २०२५ रोजी वकिलामार्फत कायदेशीर नोटीस पाठवून पंचनामा, मीटर टेस्ट रिपोर्ट, एफआयर प्रत मागितली. नोटीस न देता वीज तोडण्यात आली. त्यामुळे कुटुंब ११ दिवस अंधारात होते. १६ डिसेंबर रोजी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता पुन्हा वीज तोडण्यात आली. 'पूर्ण बिल भरा व डिजिटल मीटर बसवा, तेव्हाच लाईट जोडू' असा दबाव टाकण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे.

### वाहनाची काच फोडून रोकड लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल शहरातील ओरियन मॉलसमोरील सेवा रस्त्याला लागून उभ्या असलेल्या वाहनाची काच फोडून रोकड लंपास केली. या प्रकरणी सुकापूर येथील हॉटेल चालकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पनवेलमध्ये हॉटेलबाहेर उभ्या केलेल्या मोटारींच्या काचा फोडून रोकड व इतर महागड्या वस्तू चोरांनी पळवल्या आहेत. कॅफेचालक तरुणाला रात्री तीन वाजता मोटारीच्या मागील दरवाजाची काच फोडून एक लाख रुपयांची रोकड आणि ओळखपत्र चोरले.

### पोलिसांच्या वाहनावर दगड मारून दोघेजण पळाले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** झोन श्री स्ट्राइकिंग वाहनावर दुचाकी वरून आलेल्या इसमांनी दगड मारून ते पळून गेले. या प्रकरणी दोन अनोळखी ईसमाविरोधात 16 डिसेंबर रोजी रात्री खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.16 डिसेंबर रोजी रात्री बाराच्या सुमारास कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत तृतीय पंथीयांना हुसकावण्यासाठी हद्दीतील स्टील मार्केट आणि पुरुषार्थ ब्रिज येथे झोन श्री स्ट्रायकिंग वाहनाने पोलिसांनी भेटी दिल्या.

त्यावेळी त्या ठिकाणी तृतीयपंथी आढळले नाहीत. त्यानंतर स्ट्रायकिंग वाहन खारघर पोलीस ठाणे हद्दीत कारवाईसाठी गेले. यावेळी बेलपाडा येथील खारघर रेल्वे स्टेशनच्या स्कायवाक ब्रिजच्या पुढे काही तृतीयपंथी आढळून आले त्यांना हुसकावण्यात आले.

यावेळी त्या ठिकाणी काही इसम उभे होते त्यांना देखील पोलिसांनी हुसकावले.

यावेळी पोलिसांचा स्टाफ तेथून निघण्याच्या तयारीत असताना रात्री एकच्या सुमारास दोन अनोळखी ईसम दुचाकी वर आले आणि त्यांनी स्ट्राइकिंग वाहनाच्या चालकाच्या बाजूला दगड मारून ते दुचाकीवरून पळून गेले. यात आरशाची काच फुटून नुकसान झाले.

### वाहनाखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक दिल्याने खाली पडलेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावरून वाहन गेल्याने त्याचा चिरडून मृत्यू झाल्याची घटना घडली. मोहम्मद हरून इमाम अली असे त्यांचे नाव आहे. बरकत अली चौधरी याने त्याचा मित्र सत्यप्रकाश याला मॅरेथॉन पळस्पे फाटा येथे सोडल्यानंतर मोहम्मद हरून याला फोन केला असता, फोन उचलणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीने मोहम्मद हरून इमाम अली हा त्याच्या दुचाकीने जात मुंबई-पुणे महामार्गावरून असताना अज्ञात वाहनाने त्याच्या मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

---

## राष्ट्रवादी काँग्रेस पा.(अजित दादा पवार गट) श्री.अजिनाथ बेल्हेकर यांना

# लोणी सय्यदमीर पं.समिती गणातून उमेदवारी द्यावी

## माहिती अधिकार तथा सामाजिक कार्यकर्ते श्री.बाबु देवकर

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे :** मा.आ.बाळासाहेब आजबे यांचे कट्टर समर्थक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे श्री.अजिनाथ काका बेल्हेकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) पक्षाचे तथा निसर्ग उद्योग समुहाचे सर्वेसर्वा युवा उद्योजक अजिनाथ काका बेल्हेकर हे नेहमीच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असल्याने यांच्या उमेदवारीची मागणी सध्या लोणी गण आणि पंचक्रोशी परिसरात जोर धरू लागली आहे. पंचायत समिती निवडणुकीत लोणी सय्यदमीर गणातून राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी अजित दादा पवार पक्षाने श्री अजिनाथ काका बेल्हेकर यांना उमेदवारी द्यावी, संधी दिल्यास जिल्हा परिषद निवडणुकीत सुद्धा निवडून येतील. असा विश्वास व्यक्त करत पंचायत समितीची उमेदवारी द्यावी अशी मागणी श्री. सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते श्री बाबु देवकर यांनी केली आहे.ते पुढे बोलताना म्हणाले की



श्री. अजिनाथ काका बेल्हेकर हे नाव म्हणजे विकास, प्रामाणिकपणा आणि लोकसेवा यांचा संगम आहे. मा. आ.बाळासाहेब आजबे यांचे विश्वासू सहकारी म्हणून अनेक वर्षे कार्य केलं आहे. कोरोना काळामध्ये सगळं जग बंद असताना अनेकांच्या मदतीला धावून मदत कार्य केले व अशा परिस्थितीमध्ये किराणा भाजीपाला नागरिकांच्या घरापर्यंत पोहोच करण्याचे कार्य करुण महामारी मध्ये मदत कार्य त्यांनी केले उच्चशिक्षित, दूरदृष्टी असलेले आणि लोकांशी स्नेहसंबंध राखणारे अजिनाथ काका बेल्हेकर हे राजकीय क्षेत्रात ठाम भूमिका आणि शांत स्वभावासाठी ओळखले जातात. त्यांचं व्यक्तिमत्व आत्मीयतेने भरलेलं आहे. म्हणूनच लोणी सय्यदमीर पंचक्रोशीतील नागरिकांच्या मनात "अजिनाथ काका म्हणजे आपल्या घरचा माणूस" अशी भावना निर्माण झाली आहे.त्यांनी सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. विविध धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन त्यांनी पुढाकार घेऊन केले. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी अनेकदा शैक्षणिक साहित्य, आर्थिक मदत केली. शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी नेहमी गांभीर्याने घेतल्या आणि त्यांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवले.पंचक्रोशीतील नागरिक, तरुण कार्यकर्ते, महिला मंडळे आणि शेतकरी वर्ग यांनी देखील त्यांच्या उमेदवारीसाठी एकमुखाने समर्थन व्यक्त केले आहे. गावागावात त्यांच्याविषयी सकारात्मक चर्चा सुरु आहे. "अजिनाथ काका बेल्हेकर यांची उमेदवारी म्हणजे विकासाची उमेदवारी" असे लोणी पंचायत समिती गणातील नागरिक त्यांना पंचायत समिती निवडणुकीत संधी मिळावी अथवा जिल्हा परिषद ला संधी दिली तर निवडून येतील.यात मात्र शंका नाही त्यामुळे त्यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री.बाबू देवकर यांनी केली आहे.५० हून अधिक विद्यार्थ्यांचे एसटी वेळेवर न मिळाल्याने दररोज शैक्षणिक नुकसान होत होते.

ही विद्यार्थ्यांची अडचण ओळखून अजिनाथ काका बेल्हेकर यांनी तारकपूर तसेच माळीवाडा अहिल्यानगर बसस्थानक प्रमुख पाटील यांची भेट घेऊन याची माहिती दिली. त्यांनी दुसऱ्या दिवसापासून दररोज सकाळी सात वाजता बससेवा सुरू केली होती आता देखील सुरू आहे

> लोणी सय्यदमीर पंचायत समिती गणातील नागरिकांचे म्हणणे आहे की, "अजिनाथ बेल्हेकर हे केवळ राजकारणी नाहीत तर एक प्रसिद्ध व्यावसायिक आहेत.समाजकारणी आहेत. त्यांचं काम बोलकं आहे. त्यांनी कधीही पदासाठी नव्हे, तर जनतेच्या हितासाठी काम केलं." त्यांना पंचायत समिती सदस्य म्हणून संधी दिली तर गणाचा विकास होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. अशा कार्यकर्त्याला उमेदवारी देणं म्हणजे विकासाला चालना देणं होय."श्री. अजिनाथ काका बेल्हेकर हे आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करतात. शालेय मुलांना साहित्य वितरण, झाडे वाटप, गरजूंसाठी मदत, वॉटर बॅग वाटप अशा उपक्रमांनी त्यांनी समाजाभिमुख कार्याची पायाभरणी केली आहे.स्थानिक नागरिक, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नेतेमंडळींमध्ये श्री. अजिनाथ बेल्हेकर यांचा चांगला दबदबा असून, त्यांच्या कार्यशैलीबद्दल सर्वत्र समाधान आहे. लोणी सय्यदमीर पंचायत समिती गणात श्री. अजिनाथ काका बेल्हेकर यांना उमेदवारी निश्चित असल्याचा जनतेत विश्वास व्यक्त होत आहे

---

### खांदा कॉलनी सी के टी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र कांबळे/खांदा कॉलनी प्रतिनिधी :** पनवेल महापालिके तर्फे रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम अनेक ठिकाणी सुरू आहे परंतु खांदा कॉलनी मधील सी के टी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था इतकी वाईट झाली आहे की महिला विद्यार्थी रेल्वे ब्रीज खाली खराब रस्त्यान मुळे अपघात होऊन पडू शकतात असे असताना इथे डांबरीकरणाचे काम का होत नाही असा प्रश्न अनेकांना पडतो लोकप्रतिनिधी देखील या डांबरीकरणाच्य कामासाठी पाठपुरावा केला परंतु रेल्वे ब्रीज खाली डांबरीकरणा साठी रेल्वे खात्याची परवानगी घेणे ही आवश्यक आहे शिवाय ब्रीजची हाईट देखील कमी आहे अशा अनेक अडचणी मुळे काम होत नसल्याचे समजते परंतु राज्यांत केंद्रात भाजपचे सरकार असताना अशा अडचणीच्या ठिकाणी किती दिवस अजून मार्ग निघणार नाही आता या ब्रीज खाली मोठ मोठे खड्डे पडू लागले आहेत त्यामुळे गाड्या देखील फसत आहेस त्यामुळे काही वेळेला वाहतूक कोंडी सुद्धा होते

या रोडवरून सातत्याने विद्यार्थी प्रवास करत असतात मुली महिला प्रवास करतात त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात हा रस्ता डागडुजी करणे महत्त्वाचे आहे जेणेकरून असा अपघात होऊ नये ज्यामुळे मानवी हानी होईल त्यामुळे पनवेल महापालिकेने या नागरी समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे

### आंतरराष्ट्रीय फुले फेस्टीव्हल साठी पुणे येथे अँड रोहिणी ताई जाधव यांची निवड करण्यात आली

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** पुणे येथे २ ते पाच जानेवारी दरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल साठी कवियात्री अँड रोहिणी ताई जाधव मुंबई यांना निवड पत्र देऊन निमंत्रित करण्यात आले.व अध्यक्ष पद भूषवण्या मान सुध्दा त्यांना मिळाला आहे. रोहीणी ताई ह्या वकीली करीत त्यांना काव्याचा पण छंद जोपासला .

बऱ्याच ठिकाणी त्यांना



कार्यक्रमात साठी निमंत्रित केले जातात. व सामाजिक ,सांस्कृतिक , शैक्षणिक, क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी त्यांची आहे.

एस.एम.जोशी फाउंडेशन सभागृहात पुणे येथे दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल महोत्सव साठी अँड रोहीणी ताई जाधव यांची सुप्रसिद्ध कवयित्री म्हणून फेस्टिवल चे आयोजक भिडे वाडकर सविंधानधुत विजय वडवेराव सर यांनी निमंत्रित केले आहे.

व निवड झाल्या बद्दल सर्व स्तरातून रोहिणी ताई चे अभिनंदन केले जात आहे.

व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

---

### १६ वर्षीय तरुणीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन नेले पळवून

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** पनवेल जवळील असुडगाव येथे राहणाऱ्या १६ वर्षीय तरुणीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन दिनांक 03/11/2025 रोजी पळवून नेल्याची तक्रार खान्देश्वर शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

सदर तरुणीचे नाव रोजी खातुन समसुद्दीन मन्सुरी, वय 16 वर्षो 10 महिने 03 दिवस, उंची 5 फुट रंग सावळा, अंगाने सडपातळ, अंगात नेसुस निळी जिन्स, दुपट्टा व निळ्या रंगाचा टॉप त्याव पांढ-या रंगाचे टिपके, नाक सरळ, चेहरा उमट, केस



काळे लाम डोले काळे मध्यम, भाशा भोजपुरी व हिंदी बोलते या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खान्देश्वर शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे 98506 41629 यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान करण्यात आले आहे

### गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले! मकोका लावून उत्पादकांवर कडक कारवाई, बंदी हप्तेवाल्यांचेही पाणी भिजले

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग/रेवदंडा | प्रतिनिधी :** राज्यात गुटखा बंदी असतानाही रेवदंडा शाळा परिसर, बाजारपेठ, चौल नाका, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा विक्रीचा अवैध धंदा फोफरटा होत आहे. जनतेत संतापाची चर्चा उसळत असताना राज्य सरकारने गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी 'मकोका'चा धाक निर्माण केला आहे. येत्या नववर्षापासून गुटखा उत्पादकांवर मकोका लावला जाणार असून, कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करण्यात येणार आहेत, अशी पक्की माहिती अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.गुटखा विक्रेते, होलसेल अवैध धंदेवाले आणि स्थानिक बंदी हप्तेवाल्यांच्या पायाखाली जमीन सरकतेय! स्थानिक सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये मकोका कायद्यामुळे अस्वस्थता पसरली असून, जनतेत जोरदार चर्चा सुरू आहे. यापूर्वी विधी व न्याय विभागाकडे मकोका प्रस्ताव पाठवण्यात आला होता, पण 'हार्म आणि हर्ट' या घटकांअभावी तो अटकावला गेला. आता मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार नागपूर अधिवेशन संपताच अन्न व औषध प्रशासनाने वेगाने हालचाली सुरू केल्या आहेत. कायद्यात बदल करून गुटखा व्यवसायाला संघटित गुन्हेगारी म्हणून वर्गीकृत करून मकोका लावण्याचा बेत आखण्यात आला आहे.शाळा-कॉलेज परिसरात गुटखा विक्री? आता मकोकाचा फटका, हप्तेवाल्यांना धूळ!मंत्री झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना सुधारित प्रस्ताव तात्काळ विधी विभागाकडे पाठवण्याचे आणि कायदे कठोर करण्याचे निर्देश दिले आहेत. गुटखा उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष धोरण राबवले जाणार असून, मनुष्यबळ वाढवण्यात येत आहे. १९७ अन्न सुरक्षा अधिकारी आणि १०९ औषध निरीक्षकांची भरती प्रक्रिया वेगाने राबवली जात असून, प्रशिक्षणानंतर तत्काळ नियुक्त्या होणार आहेत. शाळा-महाविद्यालय परिसरात गुटखा-तंबाखू विकणाऱ्यांवर पहिल्यांदा आघाडीची कारवाई करून अवैध धंदेवाल्यांना आणि हप्तेवाल्यांना धूळ चारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.गुटखा विक्रेत्यांनो, हप्तेवाल्यांनो सावध व्हा! कायद्याच्या या कडक कोथडीतून सुटका नाही. राज्य सरकारचा हा ठाम निर्णय अवैध धंद्यांना धाब्यावर बसवणार आहे.



---

### रेती तस्करांचा पोलीस अधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ला; बचावासाठी केला हवेत गोळीबार

**मोरथ येथील घटना एपी .आय .अंभोरे जखमी**

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशे महागाव ( यवतमाळ) :** तालुक्यात रेतीची बेकायदेशीर वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यावर पाच ते सात जणांच्या टोळक्याने सिमेंटच्या मोठ्या झाकणाने प्राणघातक हल्ला केल्याची गंभीर घटना घडली आहे. या हल्ल्यात पोलीस अधिकाऱ्याच्या हाताला दुखापत झाली असून आरोपी ट्रॅक्टरसह पसार झाले आहेत.



**घटनास्थळी दंगल नियंत्रण पथक**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पोलीस अधिकारी रात्रीच्या सुमारास गस्त घालत असताना रेतीची चोरटी वाहतूक करणारा ट्रॅक्टर आढळून आला. ट्रॅक्टर अडवण्याचा प्रयत्न केला असता, चालक व त्याच्या साथीदारांनी अचानक आक्रमक भूमिका घेतली. पाच ते सात जणांनी एकत्र येत पोलीस अधिकाऱ्यावर सिमेंटचे मोठे झाकण फेकून तसेच मारहाण करून हल्ला केला.

परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलीस अधिकाऱ्याने स्वतःच्या बचावासाठी हवेत दोन गोळ्या झाडल्या. मात्र तरीही आरोपी ऐकण्याच्या मनःस्थितीत नसून त्यांनी अधिकाऱ्यावर मारहाण सुरूच ठेवली. या झटापटीत पोलीस अधिकाऱ्याच्या हाताला दुखापत झाली.हल्ल्यानंतर आरोपी ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळवून नेण्यात यशस्वी झाले. जखमी पोलीस अधिकाऱ्यावर तातडीने उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.या घटनेनंतर पोलीस विभागात खळबळ उडाली असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे. रेती माफियांविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिला आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या राळेगाव शहर अध्यक्षांचा राजीनामा

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/राळेगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राळेगाव शहर अध्यक्ष तथा पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावान कार्यकर्ते प्रकाश माधवराव खुडसंगे यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी हा राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षा सौ. वर्षाताई निकम यांच्याकडे सादर केला आहे.प्रकाश खुडसंगे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पक्षाशी एकनिष्ठ राहून कार्यरत होते. राळेगाव शहर अध्यक्ष या नात्याने त्यांनी पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी, सामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच



विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पक्षाचा विस्तार करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.राजीनाम्याबाबत माहिती देताना त्यांनी नमूद केले आहे की, सध्या काही वैयक्तिक कारणांमुळे पक्षाच्या कामकाजाला अपेक्षित वेळ व न्याय देता येत नसल्याने, पक्षाच्या कार्यावर कोणताही परिणाम होऊ नये या उद्देशाने त्यांनी स्वेच्छेने हा निर्णय घेतला आहे. पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या, विश्वास व सन्मानाबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले आहेत.

दरम्यान, राजीनामा दिल्यानंतर प्रकाश खुडसंगे यांनी पुढील काळात आपली राजकीय भूमिका स्वतंत्रपणे ठरवण्याचा अधिकार राखून ठेवला असून, भविष्यात योग्य वेळी ते कोणत्याही राजकीय पक्षात सहभागी होण्याचा निर्णय घेऊ शकतात, असेही संकेत त्यांनी दिले आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे राळेगाव तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.प्रकाश खुडसंगे यांच्या राजीनाम्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थानिक संघटनात पुढील काळात काय बदल होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पसमध्ये मेकरथॉन ७.० चे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पिल्लई विद्यापीठाने - अभियांत्रिकी, वास्तुकला, वाणिज्य, डिझाइन आणि व्यवस्थापन यांचा समावेश असलेल्या "मेकरथॉन ७.० - विचार करा, शिका, तयार करा" या प्रमुख नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पसमध्ये यशस्वी आयोजन केले. "मेक इन इंडिया" च्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या या कार्यक्रमात ठाणे, कल्याण, पनवेल, नवी मुंबई आणि मुंबई येथील संस्थांमधील मार्गदर्शक शिक्षकांनी पाठिंबा देऊन १८९ आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन संघांचे १००० हून अधिक विद्यार्थी एकत्र आले.




मेकरथॉन ७.० ने तांत्रिक नवोपक्रम आणि अनुभवात्मक शिक्षणासाठी एक जीवंत, समोरासमोरचा व्यासपीठ प्रदान केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संकल्पनांना वास्तविक जगातील अनुप्रयोगांशी जोडता आले. प्रत्यक्ष समस्या सोडवण्याद्वारे, सहभागींनी गंभीर विचारसरणी, तार्किक निर्णय घेण्याची क्षमता, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये आणि आत्म-चिंतन बळकट केले - वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही विकासाला चालना दिली. पिल्लई विद्यापीठाच्या शैक्षणिक तत्वज्ञानाच्या गाभ्यामध्ये अनुभवात्मक शिक्षण आहे. विद्यापीठ "करून शिकणे" यावर दृढ विश्वास ठेवते, जिथे विद्यार्थी निष्क्रिय वर्ग सूचनांऐवजी वास्तविक जीवनातील आव्हाने, प्रयोग आणि चिंतनात सक्रियपणे सहभागी होतात. शैक्षणिक अनुभवांमध्ये डिझाइन विचारसरणी, प्रोटोटाइपिंग, सांघिक कार्य (टीमवर्क) आणि उद्योग-संबंधित समस्या विधाने एकत्रित करून, पिल्लई विद्यापीठ हे सुनिश्चित करते की शिक्षण कृती-केंद्रित, अर्थपूर्ण आणि वास्तविक जगाच्या अपेक्षांशी सुसंगत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या वर्कस्टेशन्सवर सक्रियपणे विचारमंथन केले, कल्पनांना कार्यरत नमुनांमध्ये रूपांतरित केले आणि तज्ञ ज्युरींसमोर त्यांचे उपाय सादर केले. सहभागींनी प्रचंड उत्साह व्यक्त केला, मेकरथॉन ७.० द्वारे देण्यात येणाऱ्या सर्जनशीलता, आव्हान आणि प्रेरणा यावर प्रकाश टाकला.

यावेळी अध्यक्ष डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई यांच्या हस्ते २ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप समारंभातील भाषणात कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट - "विचार करा, शिका, निर्माण करा" - अनुभवात्मक शिक्षण आणि आत्मविश्वास निर्माण करून विद्यार्थ्यांना सक्षम बनवून यशस्वीरित्या साध्य केले गेले यावर भर देण्यात आला. यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान (शाळा) - प्रथम पारितोषिक: सरस्वती माध्यमिक विद्यालय (मराठी), ठाणे, द्वितीय पारितोषिक: सेंट थॉमस अकादमी ऑफ एज्युकेशन, विचुंबे, नवीन पनवेल, तृतीय पारितोषिक: डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी, नवीन पनवेल. विज्ञान आणि तंत्रज्ञान (कनिष्ठ महाविद्यालये) - प्रथम पारितोषिक: सी. के. टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल, द्वितीय पारितोषिक: एम्पायरियन स्कूल, खारघर, तृतीय पारितोषिक: सेंट जोसेफ हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, कळंबोली. डिझाइन - आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंग (शाळा) - प्रथम पारितोषिक: जयपुरियार स्कूल, सानपाडा, दुसरे पारितोषिक: अपीजे स्कूल, नेरुळ, तिसरे पारितोषिक: सेंट लॉरेन्स हायस्कूल, वाशी. डिझाइन – आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंग (कनिष्ठ महाविद्यालये) - प्रथम पारितोषिक: न्यू होरायझन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, द्वितीय पारितोषिक: सी. के. टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, पनवेल, तृतीय पारितोषिक: सेंट मेरीज ज्युनियर कॉलेज, वाशी. बिझाथॉन (ज्युनियर कॉलेजेस)- प्रथम पारितोषिक: न्यू होरायझन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, दुसरे पारितोषिक: डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी, न्यू पनवेल, तिसरे पारितोषिक: बाल भारती पब्लिक स्कूल, खारघर, नवी मुंबई.

मेकरथॉन ७.० ने अनुभवात्मक शिक्षणाद्वारे नावीन्यपूर्णता, सहकार्य आणि उद्योगासाठी तयार कौशल्ये जोपासण्याच्या पिल्लई विद्यापीठाच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.

# वीर वाजेकर महाविद्यालयात "विद्यार्थी–पालक" मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे :** रयत शिक्षण संस्थेच्या, वीर वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,फुंडे "विद्यार्थी-पालक" मेळावा संपन्न. विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक अहवालाविषयी चर्चा व्हावी म्हणून "विद्यार्थी-पालक" मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ.आमोद ठक्कर,प्रभारी प्राचार्य,यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी काय करते याचा आलेख पालकांसमोर सादर केला. NEP मध्ये परीक्षा पद्धती व शिक्षण पद्धतीत आमूलाग्र



बदल झाला आहे,परीक्षा पद्धतीत झालेला बद्दल सर्वांनाच नवीन असल्याने विद्यार्थी,पालक आणि शिक्षक यांनी समजून घेणे गरजेचे आहे.नवीन शैक्षणिक धोरण राबवित असतांना येणाऱ्या अडचणी पालक शिक्षक व विद्यार्थी यांना समवेत घेऊन सोडविणे आवश्यक आहे. महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रम जसे की करियर गाईडन्स, कौशल्य विकास, आपत्ती व्यवस्थापन रोजगाराच्या संधी, रोजगार मेळावे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन व विविध कला क्रिडा स्पर्धा ह्याचीविस्तृतमाहितीदिली. आजच्या पालकाला अधिक सजग राहणे गरजेचे आहे. आपला पाल्य नियमित कॉलेजला जातो किंवा नाही याविषयी पालकांनी जागरूक राहायला हवे. महाविद्यालय आपल्या पाल्याच्या विकासासाठी नेहमीच जागरूक आहे,त्याबरोबरच पालकांनी सुद्धा जागरूक राहून सतत महाविद्यालयाशी संपर्कात राहून आपल्या पल्याविषयी चौकशी करावी. विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती वाढविण्यासाठी पालकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे डॉ.आमोद ठक्कर,प्रभारी प्राचार्य,यांनी यावेळीव्यक्त केले.

पालक मेळाव्यात पालक म्हणून श्री.नवनाथ ढवळे यांनी आपल्या मनोगतातून प्राचार्यांच्या मनोगताला दुजोरा देतांना आम्ही पालक म्हणून आपल्या महाविद्यालयाच्या पाठीशी आहोत,सौ.नीलिमा शरद घरत यांनीही महाविद्यालय आमच्या मुलांसाठी सतत नवं नवे उपक्रम राबवित असते,हे आमचे पाल्य आम्हाला सांगत असतात.अशाप्रकारे पालक मेळाव्याचे आयोजन महाविद्यालयात नियमित व्हायला हवेत. डॉ.झेलम झेंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा.भूषण ठाकूर यांनी कार्यक्रमाचे आभार मानले, प्रा. प्रांजळ भोईर यांनी सूत्रसंचालन केले. २५० पालक उपस्थित होते, उपप्राचार्य डॉ पालवे उपप्राचार्य श्री चव्हाण सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

# मुंबई दादर येथील रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी रेल्वे स्टेशन नाव द्या ,अखिल भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतिकारी सामाजिक संघटनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेल द्वारे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/मुंबई :** भारतातील व देश विदेशातील करोडो लोकांचे मुंबई दादर येथील येथील भारतीय संविधानाचे निर्माते बोधिसत्व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे असलेले पवित्र स्मारक करोडो लोकांचे प्रेरणास्थान आहे. त्यामुळे दादर येथील रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी रेल्वे स्टेशन नाव देण्यात यावे अशी मागणी अखिल भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतिकारी सामाजिक संघटनेचे संस्थापक सचिव श्रीकृष्ण देशभ्रतार व अखिल भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतिकारी सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजीव भांबोरे यांनी ई-मेलद्वारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना केलेली आहे. सविस्तर वृत्त असे की ,मुंबई दादर येथील चैत्यभूमी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पवित्र स्मारक असून तेथे त्यांची अस्थि समाधीत आहेत. हे ठिकाण दादरच्या




शिवाजी पार्क जवळ असून समुद्र किनाऱ्यावर नैसर्गिक ठिकाणी आहे. तेथे भव्य प्रवेशद्वारावर अशोक स्तंभाची प्रतिकृती आणि बुद्धाची मूर्ती आहे. जिथे दरवर्षी महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखोच्या संख्येने गर्दी होत असते आणि हे ठिकाण शांत व पवित्र स्थळ आहे.

# प्रभाग आठ मधून निवडणूक लढवण्यासाठी सौ बायजा बबन बारगजे सज्ज

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** महानगरपालिकेची रणधुमाळी सुरू झालेली आहे अनेक जण इच्छुक आहेत . परंतु तिकीट कुणाला मिळेल यावर सर्व अवलंबून असेल . पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग आठ मधून २०१७ ला निवडणूक लढवून थोड्याशा मतांनी पराभव पत्करलेल्या सौ बायजा बबन बारगजे या वेळेसच सुद्धा निवडणूक लढविण्यास पुन्हा सज्ज झाल्या आहेत . कळंबोली विभागातील भाजपाचे जुने नेतृत्व सात वर्षे शहराध्यक्ष राहिलेले बबन बारगजे यांचा दांडगा संपर्क आहे . सध्या बबन बारगजे गेल्या चार वेळेपासून पक्षाच्या रचनेमध्ये भाजपाचे



भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आहेत . त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे . एक साधी राहणी आणि प्रेमळ स्वभावाचा माणूस म्हणून बबन बारगजे यांच्याकडे पाहिले जाते . नोकरी सांभाळून त्यांनी जोडलेली माणसे त्यांच्यावर प्रेम करतात अनेक संघटनांशी व संस्थांशी त्यांचा दांडगा संपर्क आहे . बबन बारगजे यांच्या पत्नी सौ बायजा बारगजे या सुद्धा कळंबोली मंडळाच्या चिटणीस आहेत बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी त्यांचा पुढाकार असतो त्याचप्रमाणे केंद्रातील नरेंद्र मोदी जी यांच्या योजना व महाराष्ट्र सरकार मधील लाडक्या बहिणी सारख्या योजना प्रभागातील महिला पर्यंत त्यांनी पोहोचवल्या आहेत . त्यामुळे त्यांचा सुद्धा संपर्क चांगला आहे २०१७ मधील निवडणुकीमध्ये त्यांना कमी मतांनी पराभवाचा सामना करावा लागला होता . परंतू हार जीतची परवा न करता सर्व कुटुंब पक्षाच्या कामाला लागले व पक्षासाठी सातत्याने काम करीत राहिले . त्यामुळे त्यांच्या उमेदवारीकडे सहानुभूतीने पाहिले जाते . लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांचे निकटवर्तीय म्हणून बबन बारगजे यांना ओळखले जाते सुरुवातीच्या काळात बारगजे यांनी बाळासाहेब पाटील यांच्या सोबतही काम केलेले आहे . त्यामुळे त्यांना पक्षाच्या वरिष्ठ सर्व नेत्यांचे आशीर्वाद आहेत या सर्व गोष्टींचा विचार करता सौ बायजा बबन बारगजे यांना तिकीट मिळावे अशी प्रभागातील सर्व नागरिकांची अपेक्षा आहे . प्रभाग आठ मधील मा नगरसेवक बबन मुकादम यांचेही त्यांना चांगलं सहकार्य आहे गेल्या वेळी दोन्ही उमेदवार एकमेका विरोधात उभे होते परंतु यावेळी दोन्हीही बबन सोबत आहेत . त्यामुळे त्यांच्या विजयाचा मार्ग सोपा आहे.

# माणगांव येथे श्री दिव्यांग सामाजिक विकास संस्था मार्फत भव्य उत्सव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सचिन पवार/माणगांव रायगड :** जगभरात ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिवस साजरा केला जातो. माणगांव तालुक्यात १५ डिसेंबर रोजी श्री दिव्यांग सामाजिक विकास संस्था च्या वतीने जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधत कुंणबी समाज हॉल येथे उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी आवर्जून साईनाथ पवार, सदस्य दिव्यांग सल्लागार समिती मंत्रालय मुंबई, विपुल ढूमे माणगांव तालुका नायब तहसीलदार, निवृत्ती बोराडे पोलीस निरीक्षक माणगांव, मंगेश पाटील जिल्हा दिव्यांग समीकरण अधिकारी, वर्षा म्हात्रे महाराष्ट्र राज्य दिव्यांग विकास महामंडळ मर्यादित मुंबई अधिकारी अलिबाग, रशाद करदमे रायगड जिल्हा मानवाधिकार अध्यक्ष, समाजसेविका व माणगाव तालुका महिला अध्यक्षा स्वर्णाताई जाधव



तसेच इतर अनेक प्रतिष्ठित मान्यवर, श्री दिव्यांग संस्थेचे कोर कमिटी संस्थापक अध्यक्ष इमरान जाळगांवकर, कोर कमिटी महिला अध्यक्षा पूजा लहाने कोर कमिटी कार्यकारी अध्यक्ष सुहास गंभीर, अल्पसंख्यांक माणगांव तालुका अध्यक्ष सज्जाद गोडमे, श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था बिरवाडी, श्री दिव्यांग समिती माणगाव आणि माणगाव विभागीय कमिटीचे पदाधिकारी व सदस्य तसेच बहुसंख्याने दिव्यांग बंधू भगिनी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपापल्या भाषणात श्री दिव्यांग सामाजिक विकास संस्था माणगाव दिव्यांगच्या हिता साठी व दिव्यांग नागरिकांपर्यंत शासनाच्या अनेक योजना पोहचण्यासाठी खूप मेहनत घेत असल्याने श्री दिव्यांग संस्था च्या कार्याचे खूपच कौतुक करण्यात आले.. साईनाथ पवार व उपस्थित मान्यवरांकडून दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या अनेक सेवा सुविधां संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. समाजसेविका स्वर्णाताई जाधव यांच्याकडून दिव्यांग माता भगिनींसाठी साड्या, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अविनाश नलावडे कडून पुस्तक, एल. जी. पी. एल पेपर इंडस्ट्रिज कडून वह्या, संस्थापक अध्यक्ष इमरान जाळगांवकर कडून दिव्यांग गोर गरीब गरजू लोकांना धान्य किट वाटप करण्यात आले.. या कार्यक्रमासाठी समाजसेवक निलेश वाघरे कडून भोजनाचे आणि समाजसेवक रवींद्र सूद कडून चहापाणीचे नियोजन करण्यात आले होते.

# बोकडवीरा गावात श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताह सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** उरण बोकडवीरा गावामध्ये मार्गशीर्ष कृ.अष्टमी शुक्रवार दि.12 डिसेंबर 2025 रोजी शुभारंभ झालेला श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताह सोहळा मार्गशीर्ष कृ.व्दादशी मंगळवार 16 डिसेंबर 2025काल्याच्या कीर्तनाने समाप्त झाला.प्रतीवर्षा प्रमाणेयंदाही बोकडवीरा गणेश मंदिरा जवळील प्रथमिक शाळेच्या भव्य प्रांगणात श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताह सोहळा श्री वरदविनायक हरीनाम सप्ताह मंडळ बोकडवीरायांच्या वतीने आयोजित करण्यात अला होता.अनेक थोर गुरुमाउलींच्या आशीर्वादाने संपन्न होत असलेल्या या सोहळयाचा शुभारंभ श्री. गणेशपूजन व अभिषेक करून करण्यात आला.यावेळी प्रथेप्रमाणे



वीणा पूजन,व्यासपीठ पूजन,श्री ज्ञानेश्वरी मंगलपूजन,मंगल कलश पूजन,तुळस पूजन,ध्वजारोहण,व टाळपूजन करून करण्यात आला, दैनंदिन सायंकाळी 5 ते 6 प्रवचनाचा कार्यक्रम ह.भ.प. राजेंद्र महाराज केंद्रे, ह.भ.प.गणेश महाराज ठाकूर, ह.भ.प.राजेंद्र महाराज पाटील, ह.भ.प.धनाजी महाराज, ह.भ.प.जयंता महाराज पाटील, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील,यांच्या प्रवचनाच्या कार्यक्रमा नंतर दैनंदिन सायंकाळी विविध हरिपाठ मंडळाच्या वतीने हरिपाठाचा कार्यक्रम व रत्रो 8 ते 10 ह.भ.प. सोनाली ताई फडके(दौंड-पुणे), ह.भ.प.डॉ. कैलास महाराज निचिते(शहापूर-,ठाणे) ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत(ठाणे) ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पठाडे(ठाणे), यांचे कीर्तन ,तर सोमवार दि.15 डिसेंबररोजी सकाळी 11:00 वाजता श्री ज्ञानेश्वरी पूजन त्यानंतर दिंडी प्रदक्षिणा व सायंकाळी 6 :30 वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपोत्सव साजरा करण्यात आला. या सोसोहळयांतील उल्लखनीय बाब म्हणजे सोहळया साठी पंचक्रोशीतील महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

16डिसेंबर रोजी सकाळी 9 ते 10 वाजता सामुदाईक वारकरी भजन आणि दुपारी 10 ते 12 वाजता झालेल्या ह.भ.प. भिकाजी महाराज नाईक(निगडे-आमटेंम) यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सोहळयाची सांगता झाली. पंचक्रोशीतील असंख्य भाविकांनी या सोहळयाला हजेरी लावली होती, श्री वरदविनायक हरीनाम सप्ताह मंडळ बोकडवीरायांच्या वतीने आणि दानशूर व्यक्तींच्या वतीने दैनंदिन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचालाभ पंचक्रोशिंतील असंख्य भाविकांनी घेतला.कार्यक्रम यशस्वीकरण्या करिता श्री वरदविनायक हरीनाम सप्ताह मंडळ बोकडवीरा कार्यकारी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सर्व सभासदानी परिश्रम घेतले तर ग्रामपंचायत बोकडवीरा ,ग्रामस्थमंडळ बोकडवीरा,गजानन प्रासादिक मंडळ बोकडवीरा,आणि गणपती देवस्थान बोकडवीरा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

# टोकावडे आश्रमशाळेचे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात दैदिप्यमान यश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ/खेड पुणे :** येथील टोकावडे आश्रमशाळेने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत आदिवासी गटातून प्रथम क्रमांक पटकावून शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण, उपयुक्त व वैज्ञानिक दृष्टिकोनातून सुस्पष्ट अशा प्रकल्पाने परीक्षकांची मने जिंकली.या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांनी सहभाग घेतला होता. टोकावडे आश्रमशाळेच्या कु. दिव्या भांगे व श्रेया घिगे या विद्यार्थीनींनी *कल्पक गणिती कोडी* यावर आधारित प्रयोगशील सादरीकरण यांचा सुरेख संगम साधत उत्कृष्ट प्रकल्प मांडला.



प्रकल्पाच्या सादरीकरणावेळी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, विषयाचे सखोल ज्ञान व प्रत्यक्ष उपयोगिता यामुळे त्यांना प्रथम क्रमांकाचा मान मिळाला.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, विज्ञान शिक्षक तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या यशामागे श्री. शिंदे सर यांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत व पालकांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरल्याचे मुख्याध्यापक श्री. पी. बी. चव्हाण सर यांनी सांगितले.या विजयामुळे टोकावडे आश्रमशाळेचे नाव तालुकास्तरावर उज्ज्वल झाले असून, पुढील जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी संघाची निवड झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. शाळेच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, पालक व शिक्षणप्रेमींनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## थोडक्यात

### सन्माननीय अविनाश बाबुराव रामिष्टे यांना अथांग माथाडी कामगारांनी वाढदिवसाच्या दिल्या शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** सन्माननीय अविनाश रामिष्टे वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा १७ डिसेंबर रोजी बुधवारी तुर्भे नवी मुंबई येथे उत्साहात पार पडला. माथाडींचे कैवारी, समाजसेवक, दिनदुबळ्यांचे तारणहार अशा जयघोषाने नवी मुंबईतील तुर्भे येथील ए पी एम सी मार्केट दुमदुमले. ऐतिहासिक अभिष्टचिंतन सोहळ्यात माथाडी कामगारांनी फुल ना फुलाची पाकळी म्हणून आणलेल्या शाल ,श्रीफळ, बुफे ,हार साहेबांनी स्वीकारत त्यांचे मन भरून आले. अफाट जनसंपर्क व न्याय व हक्कासाठी लढणाऱ्या नेत्याला उदंड आयुष्य देण्याची प्रार्थना माथाडी कामगारांनी केली. सन्माननीय अविनाश रामिष्टे साहेब यावेळेस म्हणाले"मी कामगारांच्या हितासाठी व न्याय हक्कासाठी कटिबद्ध आहे. आपण अनेक अडचणीवर मात करून आपल्या सर्वांच्या सहकार्याने संघटना इथपर्यंत पोहोचली. यामध्ये सर्वात जास्त माथाडींचे योगदान आहे. महाराष्ट्रातून आलेल्या सर्व माथाडी कामगारांचे मनापासून आभारी आहे" असे म्हणत अभिष्टचिंतन सोहळ्याची सांगता केली.महाराष्ट्रातून अनेक राजकीय दिग्गज नेते ,सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिकांनी सन्माननीय अविनाश रामिष्टे शुभेच्छा दिल्या.

### विचुंबे येथे आढळला अनोळखी मृतदेह

**दैनिक युवक आधार**



**पनवेल वार्ताहर :** दिनाक 17/10/2025 रोजी 18:45 वाजताचे सुमारास विचुंबे गावात थॉमस विदयालयाजवळ असले मोकळे प्लॉटमध्ये ता पनवेल जि रायगड येथे अनोळखी बेवारस मृतदेह आढळून आला आहे वर्णन- वय अंदाजे 40 वर्श अंगाने किरकोळ, चेहरा उभट केस व दाढी काळे, नाक सरळ, व मोठे, डोळे काळे, अंगात नेसणेस चौकडा फुल बाहयाचा षर्ट निळे रंगाची इलेस्टीक अंडरपॅन्ट, निळे रंगाची जिन्स पेंट, सदर व्यक्तीस ओळखत असल्यास खान्देश्वर पोलीस स्टेशन चे उपनिरीक्षक शैलेश भद्रे 98506 41629 यांच्याशी संपर्क करावा

### आ. अमित भाऊ झनक यांची पळसखेड येथे सांत्वन पर भेट



**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी वाशिम :** रिसोड पळसखेड येथे दशरथ गयबाजी खरात व माणिक नारायण खरात यांचे वृद्धापकाळाने निधन झाले एकाच दिवसाच्या फरकाने पळसखेड येथे दोघा जणांचे निधन झाल्यामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे आज 18 डिसेंबर रोजी रिसोड मालेगाव विधानसभेचे आमदार अमित सुभाषराव झनक यांनी पळसखेड येथे जाऊन दोन्ही परिवारांची सांत्वन पर भेट घेतली यावेळी त्यांच्यासोबत खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष बबन पाटील गारडे देखरेख संघाचे सदस्य अश्रुजी खानझोडे संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात तंटामुक्ती अध्यक्ष माणिक पाटील युवा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष राजीव खरात विठ्ठल खरात प्रकाश खरात भगवानराव खरात दतराव खरात गजानन खरात हे उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग निकृष्ट कामाच्या चौकशीची मागणी-हर्षवर्धन पाटील

## नितीन गडकरी यांना पत्र-नवी दिल्ली येथे घेतली भेट अंकिता पाटील – ठाकरे सोबत

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** संत श्री तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करण्यात यावी. तसेच सध्या ठीकठिकाणची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत आदी पालखी मार्ग सुधारणे संदर्भातील अनेक मागण्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केंद्रीय रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्री ना.नितीन गडकरी यांच्याकडे नवी दिल्ली येथे बुधवारी (दि. 17) भेट घेऊन पत्राद्वारे केल्या आहेत.

या भेटी प्रसंगी अंकिता पाटील ठाकरे उपस्थित होत्या. संत तुकाराम महाराज पालखी (राष्ट्रीय महामार्ग 965 जी ) मार्ग श्री क्षेत्र देहू ते पंढरपूरचे दरम्यान असलेल्या भवानीनगर-इंदापूर-सराटी दरम्यानचे सुमारे 70 कि.मी. लांबीचे रस्त्याचे काम गेली अनेक वर्षांपासून कासवगतीने चालू आहे. सदरच्या दर्जाहीन कामांमुळे सध्या प्रवासी व जनतेमध्ये तीव्र स्वरूपाचा असंतोष निर्माण झालेला आहे. पालखी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे, त्यामुळे झालेल्या कामाची चौकशी करण्यात यावी व दर्जेदार काम करून घेण्यात यावे. सध्या पालखी मार्गाची अपूर्ण असलेली व बंद पडलेली असंख्य कामे उदा. निमगाव केतकी तसेच बावडा बाह्यवळण रस्ता, वकीलवस्ती येथील भुयारी मार्ग, वडापुरी येथील उड्डाणपूल तसेच तरंगवाडी, लासुर्णे, भवानीनगर-सणसर आदी ठिकाणचे रस्ते तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

तसेच इस्टिमेट प्रमाणे वृक्षारोपण, झाडे, रस्ता दुभाजकांची कामे, स्ट्रीट लाईट, दिशादर्शक फलक आदी कामे झालेली नाहीत. तसेच अनेक ठिकाणी गटारीची कामे झालेली नसल्याने अथवा अपूर्ण असल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरी इस्टिमेट प्रमाणे कामे पूर्ण करण्यात यावीत. चालू वर्षी जुलै महिन्यात पालखी सोहळा पंढरपुरकडे जाताना वारकऱ्यांना अनेक ठिकाणी



असंख्य अडचणींना सामोरे जावे लागले. उदा.सुरवड येथे वारकऱ्यांमध्ये चंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे पालखी रथ जाणारे गावागावातील सेवा रस्ते हे रुंद व दर्जेदार करण्यात यावेत, अशी मागणी हर्षवर्धन पाटील यांनी पत्रामध्ये केली आहे .

तसेच सध्या पालखी मार्गाची कामे अपूर्ण असताना, टोल वसुली चालु करण्यात आली आहे. पालखी मार्गाची कामे अनेक ठिकाणी अपूर्ण आहेत. त्यामुळे कराराप्रमाणे पालखी मार्गाची कामे पूर्ण झालेनंतरच टोल चालू करण्यात जावा, तोपर्यंत टोल वसुली करण्यात येऊ नये. पालखी मार्गाच्या अनेक अपूर्ण कामांमुळे आजपर्यंत ठिक-ठिकाणी अनेक अपघात झाले आहे व सध्याही घडत आहेत.

या अपघातांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागला आहे, असे या पत्रात नमूद करून वरील सर्व मागण्यांबाबत चौकशीचे आदेश द्यावेत तसेच आगामी पालखी सोहळा येण्यापूर्वी कामे पूर्ण व्हावीत, यासाठी आपण बैठक घेऊन, कामे दर्जेदार व पुर्ण करणे बाबत आदेश देण्यात यावेत, अशी विनंती या पत्राद्वारे हर्षवर्धन पाटील यांनी नितिन गडकरी यांच्याकडे केली आहे. दरम्यान, पालखी मार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करून,अपूर्ण कामे पूर्ण करणे व पत्रातील इतर मागण्या संदर्भात तातडीने संबंधितांना आदेश देण्यात येतील,असे ना.नितीन गडकरी यांनी या भेटीत नमूद केल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

## डोळ्यांत मिरची पावडर टाकली: तरुणीवर गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** ३२ वर्षीय तरुणाच्या डोळ्यांत मिरची पावडर टाकणाऱ्या तरुणीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ३२ वर्षीय तरुण तक्का येथे राहत असून, २०२० मध्ये त्याची ओळख एका तरुणीसोबत झाली आणि त्याचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. मात्र, त्यांच्यात वाद होत असल्याने २०२३ मध्ये तरुणीने ३२ वर्षीय तरुणावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात तरुण जामिनावर आहे. पनवेल रेल्वे स्टेशन येथे तो आला असताना बस डेपोच्या मागे वडील व भावासोबत आलेल्या या तरुणीने त्याच्या डोळ्यांत आणि तोंडावर मिरची पावडर टाकली. या प्रक्रणी पोलिसांनी या तरुणी विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

## मतदान जन जागृती नाटीका नागोठणे पत्रकार संघ पुरस्कृत प्रथम क्रमांकाचे मानकरी

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर :** कोकण एज्युकेशन सोसायटीच्या बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील कै.अ.जे.जैन प्राथमिक,गु.रा. अग्रवाल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिरात बुधवार 26 नोव्हेंबर रोजी सायंकाळी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला.यामध्ये मतदान जन जागृती या नाटीकेला नागोठणे पत्रकार संघ पुरस्कृत प्रथम क्रमांकाच्या बक्षिसाची मानकरी ठरली आहे. विजयी ग्रुपला को.ए.सो वर्धापन दिनाचे औचित्त साधून गुरूवार 18 डिसेंबर रोजी शाळा समितीचे चेअरमन नरेंद्र जैन व पत्रकार संघाचे प्रसिद्धी प्रमुख रोशन पत्की यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांना पाठांतर व वाचनाची सवय होऊन आपले कला गुण दाखविण्याची संधि मिळावी या उद्देशाने नागोठणे पत्रकार संघाने शाळेत दर वर्षी होणाऱ्या विविध गुणदर्शन कार्यक्रमात सादर होणाऱ्या उत्कृष्ठ नाटकाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर केले.त्यास या वर्षी मतदान जन जागृती ही नाटीका मानकरी ठरली. विजयी ग्रुपला को.ए.सो वर्धापन दिनाचे औचित्त साधून शाळा समितीचे चेअरमन नरेंद्र जैन व पत्रकार संघाचे प्रसिद्धी प्रमुख रोशन पत्की यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी मध्या. शाळा चेअरमन अनिल काळे,शाळा समिति सदस्य राजेंद्र जैन,प्रा. शाळा समिति सदस्य जयराम पवार व सुभाष जैन,प्रधान महाविद्यालय प्राचार्य दिनेश भगत,माजी प्राचार्य संदेश गुरव,माध्य.शाळा मुख्याध्यापिक देवीदास पवार,प्राथ.शाळा मुख्याध्यापिका अनघा लोखंडे,भास्कर सोलेगावकर, शाळेतील अमेसिंग गावीत,संतोष गोळे यांच्यासह विद्या संकुलनातील सर्व प्राध्यापक,शिक्षक,शिक्षिका,कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही पत्रकार समितीच्या अध्यक्षपदी शंकर वायदंडे यांची निवड, कमिटीने घेतली अनेक मान्यवरांची भेट

■ लोकशाही पत्रकार समितीच्या नवनियुक्त कार्यकारिणी मंडळाने घेतली लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट

■ मा.आमदार बाळाराम पाटील, मा.आमदार मनोहर भोईर, काशिनाथ पाटील,बबन दादा पाटील, सुदाम पाटील, शिरीष घरत, योगेश चिले ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे आदी मान्यवरांनी दिल्या शुभेछ्या



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** लोकशाही चा चौथा स्तंभ म्हणून पाहिलं जाणारं पत्रकारिता क्षेत्रात नव्या उमेदीने निपक्षपातीपणे काम करणारी पिढी तयार होणे गरजेचे आहे. याच धर्तीवर लोकशाही पत्रकार समितीची स्थापना करण्यात आली असून सा.रायगड सम्राट चे संपादक शंकर वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. "असंघटित पत्रकारांनी लोकशाहीची मूल्य जोपासत असताना आपल्या लेखणीच्या शैलीने कोणावर अन्याय होणार नाही आणि झाल्यास त्याला वाचा फोडल्याशिवाय शांत बसणार नाही अशा पद्धतीचं काम आपल्या पत्रकारितेच्या कौशल्यातून दाखवून द्यावी तसेच महिला पत्रकारांनीही दडपशाहीला न जुमानता समाजातील अन्याला वाचा फोडणे गरजेचे आहे" असं मत वायदंडे यांनी यावेळी पत्रकारांना संबोधताना व्यक्त केलं. यावेळी समितीचे कार्याध्यक्ष सनिप कलोते, उपाध्यक्ष शैलेश चव्हाण, उपाध्यक्ष गणपत वारगडा, उपाध्यक्ष अक्षय कांबळे, खजिनदार सुनील वारगडा, सह खजिनदार रोहिता साळुंखे, सचिव दिपाली पारसकर, सह सचिव प्रेरणा गावंड, प्रसिद्धी प्रमुख कृष्णा गायकवाड, संघटक आशिष साबळे, सदस्य प्रकाश मत्रे, सदस्य जितेंद्र नटे, सदस्य अजय दुबे पद्माकर कांबळे आदी पदाधिकाऱ्यांची निवड झाली असून, पुढील कामकाजाची दिशा ठरविण्यात आली.

# सोनुर्ली येथे घरालगत असलेल्या गोठ्याला आग ; आगीत एक गाय व शेळीचा होळपळून मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :** राळेगाव -तालुक्यातील सोनुर्ली येथील गोठ्याला आग लागून घरातील जीवनावश्यक वस्तू नगदी रोख रक्कम व गोठ्यातील एक गाय व शेळीचा आगीमध्ये होळपळून मृत्यू झाल्याची घटना बुधवार दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री अंदाजे साडेआठच्या दरम्यान वडकी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सोनुर्ली येथे घडली.या आगीमध्ये राजू आनंदराव मते रा. सोनुर्ली या शेतमजुराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगण्यात आले आहे.



राजू आनंदराव मते यांना घरकुल आल्याने त्यांनी आपल्या घराचे काम सुरू केले होते बांधकाम चालू असल्यामुळे त्यांनी घराजवळच असलेल्या टिन पत्र्याच्या गोठ्यात राहण्याची व्यवस्था केली होती.बुधवार ला रात्री मते परिवार घरी नसताना त्या टिन पत्र्याच्या गोठ्याला अचानक आग लागल्याची माहिती त्यांना मिळाली.आगीचे रौद्ररूप मोठे असल्याकारणाने व घरामध्ये गॅस सिलेंडर असल्याने घरात कोणीही जाण्याचे धाडस करत नव्हते ही आग इतकी भीषण होती की घराजवळ असलेल्या टिन पत्राच्या गोठ्याला आगीने आपल्या कवेत घेतले. गोठ्यामध्ये सुरेश उद्धवजी घोटेकर यांच्या मालकीची बांधलेली एक गाय व शेळी आगीत जळून मृत्युमुखी पडली.

यावेळी गावकऱ्यांनी धाडस दाखवत लगतच्या अशोक सूर यांच्या शेतातील मोटर पंपाद्वारे ही आग एका तासात आटोक्यात आणली तोपर्यंत शेतमजूर राजू आनंदराव मते त्यांच्या राहत्या घरातील सिलेंडरचा भयंकर स्फोट होऊन घरातील जीवनावश्यक वस्तू व घरकुलासाठी जमवलेली रक्कम या आगीत जळून खाक झाली घटनेची माहिती गावातील पोलीस पाटील खरवडे यांनी वडकी पोलीस स्टेशन ला दिली लगेच वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे पोलीस अंमलदार आकाश कुदुसे,अंकुश पाथोडे,चालक अमीर किंनाके घटनास्थळी दाखल झाले व या आगीची माहिती घेऊन तपास सुरू केला ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज वर्तवलेल्या जात आहे.

या आगीमुळे राजू मते या शेतकऱ्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे, सोबतच सुरेश घोटेकर यांचे गोधन जळून खाक झाल्याने मोठे नुकसान झाले आहे.

या आगीमध्ये झालेल्या नुकसान भरपाईची मागणी शेतमजूर व गोठा मालकाकडून प्रशासनाला करण्यात आली आहे.

# भाजपा नेते बबन बारगजे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीचे भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांचा वाढदिवस कळंबोली मधील श्री संत वामनभाऊ उद्यान सेक्टर 4 कळंबोली येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त खेळ पैठणीचा हा कार्यक्रम रंगला होता व या कार्यक्रमांमध्ये अनेक महिला भगिनींनी सहभागी होऊन खेळाचा आनंद लुटला . सोन्याची नथ, चांदीचा शिक्का , पैठण्या , इयरफोन परफ्युम्ज अशा अनेक भेटवस्तू महिला भगिनींना देण्यात आल्या . महिला भगिनीसह लहान मुलांनी सुद्धा सहभागी होऊन आनंद लुटला . यावेळी कराओके ऑर्केस्ट्रा चा सुद्धा कार्यक्रम आयोजित करण्यात आला . कराओके ज्या गाण्याचा आनंद येथील नागरिकांनी घेतला . संध्याकाळी सहा वाजल्यापासून मैदानाकडे अनेक रहिवाशांनी सहभाग घेतला बबन बारगजे यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही सकाळी सुभ आशीर्वाद दिले व दुपारी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण



साहेब यांनीही त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी वर्षा प्रशांत ठाकूर व चारुशीला घरत यांनी उपस्थित राहून बबन बारगजे यांना शुभेच्छा दिल्या .

संध्याकाळी कार्यक्रमाच्या वेळी पनवेलचे कार्यसम्राट आमदार माननीय प्रशांत दादा ठाकूर यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या व बबन बारगजे यांच्या वाटचालीबद्दल मनोगत व्यक्त केले

त्यांच्यासोबत उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील शहराध्यक्ष अमर पाटील जिल्हा सचिव रवीनाथ पाटील महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष सौ प्रिया मुकादम वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर पनवेल ग्रामीण अध्यक्ष दशरथ म्हात्रे माजी नगरसेवक बबन मुकादम , रवींद्र भगत , मोनिका महानवर , सौ प्रमिला पाटील , श्री अशोक मोटे विविध संस्थांचे पदाधिकारी , सहकारी सोसायटी यांचे पदाधिकारी व सर्व मित्र परिवार उपस्थित होते. सर्वांनी बबन बारगजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या .

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपा मंडळ उपाध्यक्षा मनीषा निकम महिला मोर्चाच्या सरचिटणीस दुर्गा सहानी चव्हाण मॅडम व आदर्श युवा मित्र मंडळाचे कार्यकर्ते प्रशांत देवकर , आशिष फुटाणे , महेश बारगजे रोहित माने , कृष्णा गर्जे सह अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली व हा कार्यक्रम यशस्वी केला

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध सूत्रसंचालक प्रवीण मोहोकर यांनी केले

# काँग्रेसमध्ये इनकमिंग जोरात, मिरा भाईंदरमध्ये वेंचर मेंडोंसा व तारेन मेंडोंसा यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

## भाजपाच्या भुलथापांना बळी पडू नका, महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसला विजयी करा: हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुका होत असून काँग्रेस पक्षात इनकमिंग जोरात सुरु आहे. आज मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार आणि स्थानिक राजकारणातील प्रभावशाली नेते गिल्बर्ट जॉन मेंडोसा यांचे सुपुत्र वेंचर मेंडोसा व तारेन मेंडोसा यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी भाजपा व इतर पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी या सर्वांचे काँग्रेस परिवारात स्वागत केले व मिरा भाईंदर मध्ये आता नवे पर्व सुरु झाले, असे म्हटले आहे.मिरा भाईंदरमध्ये पक्ष प्रवेश व काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्यात मागील तीन साडेतीन वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या नाहीत आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या निवडणुका होत आहेत या दरम्यानच्या काळात महानगरपालिकेत सत्ताधारी पक्षाने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला,




जनतेच्या पैशाची लुट केली, ५० खोके, एकदम ओके, चा खेळ सुरु होता. सत्ताधारी पक्षातील लोकांना भ्रष्टाचाराचा पैसा कमी पडू लागला म्हणून ते आता ड्रग्जच्या माध्यमातून तरुणपिढीला नासवण्याचे काम करत आहेत.

सपकाळ पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भाऊ प्रकाश शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील शेतात ड्रग्जचा मोठा कारखाना मुंबई क्राईम ब्रँचने कारवाई करून उघड केला. या कारखान्यात बंगाली बोलणारे कामगार काम करत होते, जवळपास ४३ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते पण खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यात हस्तक्षेप करून पकडलेल्या ४० लोकांना सोडण्यास सांगितले. दुसरीकडे एक व्यक्ती भाईयों और बहनों... म्हणून मागील ११ वर्षापासून लोकांना खोटी आश्वासने देऊन जनतेची फसवणूक करत आहे. दिल्लीत नरेंद्र मोदी तर राज्यात देवेंद्र फडणवीस जाती धर्मांमध्ये द्वेष पसरवून सामाजिक सलोखा बिघडवत आहेत. सत्ताधारी पक्षातील मंत्री व त्यांचे नातेवाईक भ्रष्टाचारात आकंठ बुडाले आहेत, मिल बाट के खाओ कारभार सुरु आहे. या सर्वांना धडा शिकवा आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला विजयी करा, असे आवाहन हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.यावेळी बोलताना माजी आमदार मुजफ्फर हुसेन म्हणाले की, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशाची लोकशाही व राज्यघटना वाचवण्याची लढाई सुरु आहे. वोटचोरी करून भाजपा निवणुका जिंकत आहे. निवडणुक आयोगाकडे मतदार यादीतील अनेक घोटाळ्यांची तक्रार केली पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. काँग्रेसने सर्वांना सोबत घेऊन काम केले आहे. भाजपा महायुती सरकारने मिरा भाईंदरला २४ तास पाणी देण्याचे आश्वासन दिले होते, मेट्रो सुरु होणार होती पण अद्याप काहीच काम झालेले नाही. आगामी काळात काँग्रेसच्या माध्यमातून या भागात विकास कामे करु, असे मुजफ्फर हुसेन म्हणाले..

# संविधानाने दिलेले अल्पसंख्याकांचे हक्क जपणे काळाची गरज – प्राचार्य राहुल डोंगरे

## अल्पसंख्याक दिनानिमित्ताने न. प. तुमसर येथे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** कार्यालय नगर परिषद तुमसर दीनदयाल जन आजीविका योजना (शहरी) व वसुंधरा शहरस्तर संस्था, तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पसंख्याक कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन नगर परिषद तुमसरच्या सभागृहात करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. विलास माटे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य राहुल डोंगरे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून पूजा लांजेवार (कार्यालय अधीक्षक) व यमु नागदेवे (प्रकल्प अधिकारी, नगर परिषद तुमसर) उपस्थित होते. मार्गदर्शन करताना प्रसिद्ध वक्ते प्राचार्य राहुल डोंगरे म्हणाले की, “अल्पसंख्याक म्हणजे




केवळ संख्येने कमी असलेला समूह नव्हे, तर समाजाच्या मुख्य प्रवाहात अनेकदा दुर्लक्षित राहणारा घटक आहे. अशा घटकांना समान संधी, सुरक्षितता व विकासाचा हक्क मिळणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.”

ते पुढे म्हणाले की, भारतीय संविधानातील अनुच्छेद २५ ते ३० अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे, शैक्षणिक संस्था चालविण्याच्या अधिकाराचे व सांस्कृतिक जतनाचे संरक्षण करतात. अल्पसंख्याकांचे हक्क जपले गेले, तरच भारताची “विविधतेत एकता” ही संकल्पना प्रत्यक्षात उतरेल. संविधानाने दिलेले अल्पसंख्याकांचे हक्क जपणे ही काळाची गरज आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना ॲड. विलास माटे म्हणाले की, “हक्क म्हणजे विशेष सवलत नव्हे, तर सन्मानाने जगण्याची हमी आहे. भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून दुर्बलांच्या वेदनांना न्याय देणारा दस्तऐवज आहे.”

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन यमु नागदेवे प्रकल्प अधिकारी यांनी केले.

तर आभार प्रीती भोयर (समूह संसाधन व्यक्ती) यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती कावळे, लीना समरीत, माधुरी बिसने, वैशाली बनसोड, नलिनी खोब्रागडे, सुनीता कटरे, रेखा सोनवाणे, कविता नागमोते, आरती झुरमुरे, रोशनी सार्वे आदींनी विशेष सहकार्य केले.

# CFS नियमांचा सर्रास भंग; वाहतूक कोंडीस कारणीभूत नवकार व अष्टे लॉजिस्टिक

## दररोजच्या जीवघेण्या वाहतूक कोंडीने प्रवासी व स्थानिक ग्रामस्थ अक्षरशः हैराण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** दळणवळण, वाहतूक व औद्योगिक व्यवसाय करताना सुरक्षितता, सुविधा आणि नियमांचे काटेकोर पालन अपेक्षित असताना पळस्पे, कोन ते कसळखंड रस्त्यावर कार्यरत कंटेनर फ्रेट स्टेशन (CFS) संलग्न नवकार व अष्टे लॉजिस्टिक यार्डकडून नियमांचा उघडउघड भंग होत असल्याचे चित्र अनेक वर्षांपासून दिसून येत आहे. या यार्डमधील शेकडो ट्रेलर व कंटेनर ट्रक थेट मुख्य रस्त्यावर बेकायदेशीररीत्या उभे राहत असल्याने संपूर्ण रस्ता जणू पार्किंग झोनमध्येच रूपांतरित झाला आहे. पनवेल RTO विभाग अधिकाऱ्यांचे मागील आठवड्यात सर्व यार्ड च्या कार्यालयात खाजगी बैठका झाल्या असल्याची खात्रीशीर माहिती समोर येत आहे आणि वाहतूक कोंडी जास्त प्रमाणात वाढत असल्याने अनेक चर्चा नागरिकांच्या माध्यमातून होताना दिसत आहे .अतिरिक्त प्रमाणात झालेला माल वाहतूक करार आणि वर्षा अंती पूर्ण करण्यासाठी दिलेला लक्ष पाहता सगळं काही आपसी ताळमेळ टाकून जनतेला वेठीस धरून ही नियम बाह्य वाहतूक कोंडी होत असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे .या बेजबाबदार व मनमानी कारभारामुळे दररोज हजारो प्रवासी, कामगार, विद्यार्थी तसेच स्थानिक ग्रामस्थांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सततची वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका, रुग्णवाहिका व अग्निशमन वाहनांना अडथळे, धुळीचे व प्रदूषणाचे साम्राज्य, ट्रक चालकांची रस्त्यावर होत असलेली शौच ,व्यसनी धाबे मधून निर्माण होणारी दुर्गंधी बेकायदेशीर रस्त्या लगत अनधिकृत टपऱ्या यामुळे नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य झाले आहे. CFS नियमांचे गंभीर उल्लंघन



करून सार्वजनिक रस्ते अडवणाऱ्या नवकार, अष्टे लॉजिस्टिकसारख्या यार्डमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीविरोधात जनतेचा आक्रोश दिवसेंदिवस तीव्र होत आहे. तरीही संबंधित प्रशासन, वाहतूक पोलीस व CFS नियंत्रण विभाग डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.या गंभीर परिस्थितीवर तात्काळ अंकुश न लावल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा स्थानिकांनी दिला आहे. लॉजिस्टिक नियमानुसार यार्डच्या पार्किंग क्षमतेची कठोर तपासणी करूनच व्यावसायिक परवाने देण्यात यावेत. आवश्यक पार्किंग, शौचालये, सांडपाणी व्यवस्थापन व मूलभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या यार्डचे उद्योग परवाने कायमस्वरूपी रद्द करून ती यार्ड तात्काळ स्थलांतरित करण्यात यावीत, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे.याशिवाय, इंडिया बुल्स परिसरात JSW कंपनीच्या कर्मचारी वाहतुकीच्या नावाखाली अनेक ट्रॅव्हल्सच्या बस रस्त्यावरच बेकायदेशीररीत्या पार्क केल्या जात असून, हातगाड्या, ढाबे व इतर अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत. या सर्व बेकायदेशीर प्रकारांवर तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिकांनी समाजमाध्यमांतून दिला आहे.

# उबदार राहा, तंदुरुस्त राहा : वोक्हार्ट हॉस्पिटल नागपूरने हिवाळ्यातील पौष्टिक आहाराचे महत्त्व सांगितले”

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी :** नागपूर हिवाळा आला की ओठ फाटणे, त्वचा कोरडी पडणे, टाचांना भेगा पडणे असे त्रास वाढतात. रजईत एक तास जास्त गुंडाळून बसण्यासाठी हा सुंदर मोसम असला तरी या काळात सर्दी, खोकला आणि फ्लूची लक्षणे जास्त दिसतात. त्यामुळे लोक बहुतेक वेळ घरातच राहणे पसंत करतात. तसे पाहिले तर हिवाळा हा गरम अन्न पदार्थ, हेल्दी फूड आणि गरम कपड्यांचा काळ आहे. या हंगामात मानवी शरीराची चयापचय आणि उर्जा पातळी बदलते. आपल्या खाण्याच्या सवयींमध्येही बदल जाणवतो. हिवाळ्यात अधिक खाण्याची इच्छा निर्माण होते आणि उबदार वाटण्यासाठी लोक जास्त कॅलरीचे पदार्थ खाण्याकडे वळतात. थंडीत आजारांपासून बचावासाठी शरीराला काही प्रमाणात अतिरिक्त ऊर्जा आवश्यक असली तरी, हवामान हे अस्वस्थ किंवा अयोग्य खाण्याचे कारण ठरू नये. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरने हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवणाऱ्या आणि आरोग्य मजबूत करणाऱ्या पौष्टिक खाद्यपदार्थांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

आता आपल्या शरीराच्या पोषणाच्या गरजांकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे. मजबूत रोगप्रतिकारक शक्ती किती महत्त्वाची आहे, हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. हिवाळ्यात सर्दी-खोकला लवकर होते, आणि अशा वेळी आजारी पडणे कोणालाही नकोच असते. हिवाळ्यात अनेक असे खाद्यपदार्थ उपलब्ध असतात जे केवळ चविष्टच नाहीत, तर शरीराला उब देणारे आणि आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध असतात. बाजारात ताजी फळे आणि भाज्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. या हंगामातील निसर्गाची ही देणगी जरूर उपभोगा. या हिवाळ्यात आपल्या आहारात नक्की समाविष्ट करावेत असे काही ‘हिवाळी सुपर फूड्स’ची यादी पुढीलप्रमाणे आहे.

1. बाजरा –गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्रातील मुख्य अन्नपदार्थांपैकी एक असलेला बाजरा हा एक पौष्टिक मिलेट आहे. याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने ती आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. यात मॅग्नेशियम भरपूर असून हृदयाच्या आरोग्यासाठी आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रणासाठी उपयुक्त आहे. बाजरी स्नायूंना ताकद देते आणि त्वचेसाठीही चांगली आहे. ती ग्लूटेन-फ्री असल्यामुळे पचनास हलकी आहे. यात लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम, झिंक आणि कॉपर हे खनिजेही मोठ्या प्रमाणात असतात. हिवाळ्यात बाजरीची खिचडी-कढी, बाजरीचे रोटले आणि बाजरी-कांदा रोटी हे आवडते पदार्थ म्हणून खूप लोकप्रिय आहेत.

2. रताळे – चविष्ट असण्याबरोबरच रताळ्यात इतर बटाट्यांपेक्षा दुप्पट फायबर असते. त्यात व्हिटॅमिन A, पोटॅशियम, व्हिटॅमिन C आणि व्हिटॅमिन B6 यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक मोठ्या प्रमाणात असतात. रताळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात, बद्धकोष्ठता कमी करतात



आणि शरीरातील सूज कमी करण्यास मदत करतात. हिवाळ्यात उब मिळण्यासाठी आपण रताळे भाजून, वाफवून किंवा आपल्या आवडीनुसार कोणत्याही प्रकारे खाऊ शकता.

3. खजूर – खजूर हे आपल्या लहानपणापासून ओळखीचे सुपर फूड आहे. आठवत असेल तर अनेकांच्या आई खजूरचे तुकडे करून त्यात तूप भरून द्यायच्या. हिवाळ्यात नियमित खजूर खाल्ल्याने शरीराला उब मिळते. खजूरमध्ये लोह, प्रथिने, कॅल्शियम आणि अनेक महत्त्वाची जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात, जी आरोग्य आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठी खूप आवश्यक आहेत. रोजच्या आहारात खजूराचा समावेश केल्याने तुमच्या आरोग्याला नक्कीच फायदा होईल.

4. लिंबूवर्गीय फळे (सिट्रस फ्रूट्स) – तुम्हाला माहीतच आहे की सिट्रस फळे व्हिटॅमिन C चे मुख्य स्रोत आहेत, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. या फळांमध्ये फायबर देखील भरपूर असते. सिट्रस फळे पचन सुधारण्यासाठी आणि वजन कमी करण्यासही उपयोगी आहेत. एक बाउल ताज्या सोललेल्या संत्र्यांमध्ये सुमारे 4 ग्रॅम फायबर मिळते.

5. सुकामेवा (बदाम, अक्रोड) – बदाम आणि अक्रोड हे हिवाळ्यातील उत्तम खाद्यपदार्थ आहेत, जे स्नायू आणि मज्जासंस्था (नर्वस सिस्टीम) मजबूत ठेवतात, इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवतात आणि व्हिटॅमिन E व ओमेगा फॅट्समुळे हे हृदयासाठी फायदेशीर आहेत..

6. डाळिंब – हा लाल फळ एंटीऑक्सिडंट्स आणि पोषक घटकांनी समृद्ध आहे, जे शरीरासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. डाळिंबात व्हिटॅमिन K आणि फायबर भरपूर असते, तसेच तुमच्या दैनंदिन व्हिटॅमिन C ची 48% गरज पूर्ण होते. या एंटीऑक्सिडंट्समुळे कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

7. ब्रोकोली आणि फुलकोबी – हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यासाठी क्रुसिफेरस भाज्या खूप महत्त्वाच्या आहेत. यात व्हिटॅमिन C भरपूर प्रमाणात असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास उपयुक्त आहे. या भाज्या सर्दी-खोकल्यावर मात करतात आणि हिवाळ्यात तुम्हाला सक्रिय ठेवतात. गोभी पराठा, ब्रोकोली सूप हे या भाज्यांचा आहारात समावेश करण्याचे उत्तम पर्याय आहेत.

हवामानाशी लढण्यासाठी आपल्या आजीच्या जुन्या घरगुती उपायांना (नुस्ख्यांना) विसरू नका. आले, हळद, मध आणि तुळशीसारख्या सूज कमी करणाऱ्या पदार्थांनी बनवलेला गरम कढा फक्त ऊर्जा वाढवत नाही तर रोगप्रतिकारक शक्तीदेखील मजबूत करतो. तुळशीचा गरम चहा देखील हिवाळ्यात आरामदायक असतो. तुळशीच्या चहातील हर्बल आणि हलक्या लिंबूसारख्या चवीमुळे तो खूप लोकप्रिय आहे. सूप आणि काढा यांसारखी गरम पेये हिवाळ्यात खूप उपयुक्त ठरतात. डिंक, तीळ आणि गूळ हे उष्णता देणारे पदार्थ असून हिवाळ्यात खूप खाल्ले जाते. डिंकाचे लाडू आणि तीळाची चिक्की हिवाळ्यातील लोकप्रिय पदार्थ आहेत.

हवामान बदलांमध्ये निरोगी कसे राहावे

सतत बदलणारे हवामान आणि वाढते प्रदूषण यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. पण काही छोटे दैनंदिन उपाय शरीराला नैसर्गिकरीत्या जुळवून घेण्यास मदत करतात:

1. ताजे आणि स्थानिक पदार्थ खा: स्थानिक बाजारातील हंगामी भाजीपाला आणि फळे खा. ती आपल्या शरीराच्या गरजेनुसार असतात.

2. आतून उबदार राहा: थंड सॅलड किंवा स्मूदीऐवजी शिजवलेले, हलक्या मसाल्याचे गरम पदार्थ खा.

3. हायड्रेटेड राहा: शरीरात ओलावा टिकवण्यासाठी गरम पाणी, सूप किंवा हर्बल चहा प्या.

4. प्रोबायोटिक्सचा समावेश करा: घरचे दही, ताक आणि आंबवलेले पदार्थ पचनासाठी आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी उत्तम आहेत.

5. रोगप्रतिकारक शक्ती वाढवा: रोज आंवळा, हळदीचे दूध आणि हंगामी भाज्या आहारात ठेवा.

6. आरोग्यदायी फॅट्स वापरा: जेवणात एक चमचा तूप घ्या. ज्यामुळे पचन सुधारते आणि शरीरातील कोरडेपणा कमी होतो.

7. सकाळचे ऊन घ्या: व्हिटॅमिन D मिळते आणि मन प्रसन्न राहते.

8. व्यायाम करा आणि सक्रिय राहा: हलके योगासन, चालणे किंवा स्ट्रेचिंग केल्याने रक्ताभिसरण सुधारते.

9. पुरेशी झोप घ्या: चांगली झोप शरीराची दुरुस्ती करते आणि प्रतिकारशक्ती मजबूत करते.

भारतामधील हिवाळा म्हणजे शरीराला पोषण देण्याचा काळ आहे, अन्नावर बंधन घालण्याचा नाही. सरसोंचा साग, तीळाचे लाडू आणि पारंपरिक सवयी स्वीकारून आपण हिवाळ्याचा आनंद उब, ताकद आणि चांगल्या आरोग्यासह घेऊ शकतो.

हंगामी अन्नपदार्थ खा, मसाले योग्य प्रमाणात वापरा आणि सक्रिय राहा. ही हिवाळ्यासाठी खरी भारतीय आरोग्याची गुरुकिल्ली आहे!

**लेखिका : स्वाती अवस्थी, मुख्य आहारतज्ञ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर**